७० वर्ष

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. २४ मार्च २०२६

www.dainikesandhya.com    www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०८८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## कमी दृश्यमानता असताना लँडिंगचा हट्ट का?

मुंबई (दै. संध्या) : "२८ जानेवारी २०२६ हा महाराष्ट्राच्या इतिहासातील काळाकुट्ट दिवस होता, ज्या दिवशी राज्याचा दैदिप्यमान तारा निखळला. पण आज दोन महिने उलटूनही आपल्या लाडक्या नेत्याच्या मृत्यूचे सत्य समोर का येत नाही?" असा आर्त सवाल करत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार चेतन तुपे यांना आज विधानसभेच्या सभागृहात रडू कोसळले. २९३ च्या प्रस्तावावरील चर्चेदरम्यान तुपे यांनी अजित पवारांच्या विमान अपघातावरून सरकार आणि संबंधित 'व्हीएसआर' कंपनीला अक्षरशः धारेवर धरले. "जोपर्यंत दादांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही," असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. चेतन तुपे म्हणाले, २८ जानेवारी २०२६ हा महाराष्ट्राच्या इतिहासातील अतिशय काळाकुट्ट दिवस. ही तारीख महाराष्ट्रातील १४ कोटी जनता विसरू शकणार नाही. त्या दिवशी महाराष्ट्राच्या राजकारणातील दैदिप्यमान तारा क्षितीजावरून निखळला. आपल्यातून आपले सर्वांचे आणि महाराष्ट्राचे लाडके अजितदादा आपल्याला सोडून निघून गेले.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## अशोक खरात फाईल्स एफस्टीन फाईल्सच्याही पुढे!

मुंबई (दै. संध्या) : नाशिकमधील स्वयंघोषित 'कॅप्टन' अशोक खरात याच्या लैंगिक शोषणाचे आणि अघोरी कृत्यांचे प्रकरण आता राज्याच्या राजकारणात केंद्रस्थानी आले आहे. या प्रकरणावरून संताप व्यक्त करताना राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांनी अत्यंत खळबळजनक दावे केले आहेत. "हे प्रकरण अमेरिकेतील कुप्रसिद्ध 'एफस्टीन फाईल्स' पेक्षाही गंभीर आहे. आपणही अशोक खरातला भेटायला निघालो होतो, पण कसे वाचलो," याची आपबिती जितेंद्र आव्हाड यांनी सांगितली. अशोक खरात सध्या पोलिस कोठडीत असून, त्याची कसून चौकशी सुरू आहे. रविवारी 'एसआयटी'ने अशोक खरातची तब्बल ७ तास कसून चौकशी केली. यावेळी स्वतःला महान शक्तीचा स्वामी मानणारा हा भोंदू पूर्णपणे खचलेला पाहायला मिळाला. "नाशिक जिल्हा, कायद्याचा बालेकिल्ला" असे क्षीण आवाजात म्हणत त्याने पोलिसांसमोर शरणागती पत्करली आहे. यादरम्यान, जितेंद्र आव्हाड यांनी देखील अशोक खरात प्रकरणावर भाष्य केले.

## नाना पटोलेंनी मांडला धानाचा मुद्दा

मुंबई (दै. संध्या) : काँग्रेस आमदार नाना पटोले यांनी आज विधानसभेत विदर्भातील धान खरेदीचा मुद्दा उपस्थित केला. धान खरेदी 1 ऑक्टोबरपासून सुरू होते. पण यंदा ती 1 जानेवारीपासून सुरू झाली. आता उन्हाळी धान बाजारात येण्याची वेळ झाली असताना भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यांतील तब्बल 2 लाख क्विंटल धान खरेदी केंद्रांवर तसेच पडून आहे, असे ते म्हणालेत. नाना पटोले आज विधानसभेत बोलताना म्हणाले, आज मंत्र्यांनी आपल्या उत्तरात स्पष्ट केले की केंद्र शासनाच्या आधारभूत योजनेनुसार सर्व धान खरेदी केली जाते. त्याच निकषांवर संबंधित एजन्सी कार्यरत असतात. पण धान खरेदी 1 ऑक्टोबरपासून सुरू व्हायला हवी असताना ती 1 जानेवारीपासून सुरू होत असल्याचे दिसून येते. सध्याची परिस्थिती अशी आहे की भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये सुमारे दोन लाख क्विंटल धान अद्याप खरेदी न होता खरेदी केंद्रांवरच पडून आहे.

# भोंदूबाबा प्रकरण : SIT कडून पीडितांना समोर येण्याचे आवाहन

### संपर्क क्रमांक केला जारी; ओळख गोपनीय ठेवण्याचे आश्वासन

नाशिक (दै. संध्या)

नाशिकमधील स्वयंघोषित भोंदू बाबा अशोककुमार एकनाथ खरात उर्फ 'कॅप्टन खरात' याच्या काळ्या कारनाम्यांविरुद्ध नाशिक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. अशोक खरातवर आतापर्यंत ६ फौजदारी गुन्हे दाखल झाले असून, या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी विशेष तपास पथक (SIT) नियुक्त करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, एसआयटीने आता पीडितांसह जनतेला समोर येण्याचे आणि तक्रार नोंदवण्याचे आवाहन केले आहे. तसेच माहिती देणाऱ्यांची ओळख गोपनीय ठेवली जाईल, असे आश्वासनही पोलिसांकडून देण्यात आले आहे.



अशोक खरात याच्याविरोधात दाखल झालेल्या विविध गुन्ह्यांची व्याप्ती मोठी असल्याचे तपासात समोर येत आहे. एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते (भा.पो.से.) यांच्या नेतृत्वाखालील पथक या प्रकरणाची तांत्रिक आणि पुराव्यानिशी चौकशी करत आहे. केवळ ६ गुन्ह्यांपर्यंत मर्यादित न राहता, जर इतर कुणाचीही फसवणूक किंवा छळ झाला असेल, तर त्यांनी पोलिसांशी संपर्क साधवा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अनेक पीडित व्यक्ती बदनामीच्या भीतीने तक्रार करण्यासाठी पुढे येत नाहीत. हीच बाब लक्षात घेऊन एसआयटीने स्पष्ट केले आहे की, जे नागरिक किंवा पीडित या गुन्ह्यांसंबंधी माहिती देतील, त्यांची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल. आरोपी अशोक खरात याने कोणाविरुद्धही कोणताही अपराध केला असल्यास किंवा त्याबाबतची माहिती उपलब्ध असल्यास ती त्वरित पोलिसांना कळवावी.

तक्रारदार किंवा माहिती देणाऱ्यांनी पोलीस उप अधीक्षक किरणकुमार सुर्यवंशी, महिला पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे, पोलीस निरीक्षक राहुल मोरे या अधिकाऱ्यांशी किंवा ९५०३२७०२२४ आणि ७७७५८१६३८९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, अशोक खरातच्या कारनाम्यांमुळे अवघ्या महाराष्ट्रात खळबळ माजली आहे. पोलिसांनी खरातला अटक केली आहे. तसेच त्याच्या ट्रस्टवरील सदस्या रुपाली चाकणकर यांनाही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. तपासादरम्यान असे निदर्शनास आले आहे की, काही विकृत मानसिकतेचे लोक कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि मॉर्फिंग तंत्रज्ञानाचा वापर करून महिलांचे बनावट तसेच आक्षेपार्ह फोटो तयार करत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, या प्रकरणाशी कोणताही संबंध नसलेल्या निरपराध महिलांचे फोटोही चुकीच्या पद्धतीने वापरले जात असून, त्यांची सामाजिक प्रतिष्ठा धुळीस मिळवण्याचा प्रयत्न होत आहे. सायबर पोलिसांनी अशा सर्व संशयास्पद पोस्ट्सवर बारकाईने लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे. प्रकरणाची संवेदनशीलता लक्षात घेता, सायबर पोलिसांनी विशेष पथकाद्वारे सोशल मीडिया मॉनिटरिंगला प्राधान्य दिले आहे. केवळ पोस्ट तयार करणारेच नव्हे, तर त्या फॉरवर्ड करणारे आणि अशा ग्रुप्सचे ॲडमिनही पोलिसांच्या रडारवर आहेत. तपासात अडथळा निर्माण होईल किंवा प्रकरणाला वेगळे वळण लागेल, अशा कोणत्याही कृत्यावर पोलिस कठोर कायदेशीर कारवाई करण्याच्या तयारीत आहेत.

### पीडित महिलांचे फोटो, व्हिडिओ शेअर करणाऱ्यांवर थेट गुन्हा

नाशिकमधील गाजत असलेल्या अशोक खरात प्रकरणात आता पोलिस प्रशासनाने सोशल मीडियावरील 'डिजिटल' गुन्हेगारीविरुद्ध मोठे पाऊल उचलले आहे. या प्रकरणातील पीडित महिलांचे फोटो, व्हिडिओ आणि आक्षेपार्ह मजकूर व्हायरल करणाऱ्यांविरोधात नाशिक सायबर पोलिसांनी कडक पवित्रा घेतला आहे. पीडितांची बदनामी करणाऱ्या आणि त्यांची ओळख उघड करणाऱ्या समाजकंटकांवर थेट गुन्हे दाखल करणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. भोंदू अशोक खरातच्या कारनाम्यांमुळे अवघ्या महाराष्ट्रात खळबळ माजली आहे. पोलिसांनी खरातला अटक केली आहे. तसेच त्याच्या ट्रस्टवरील सदस्या रुपाली चाकणकर यांनाही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. तपासादरम्यान असे निदर्शनास आले आहे की, काही विकृत मानसिकतेचे लोक कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि मॉर्फिंग तंत्रज्ञानाचा वापर करून महिलांचे बनावट तसेच आक्षेपार्ह फोटो तयार करत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, या प्रकरणाशी कोणताही संबंध नसलेल्या निरपराध महिलांचे फोटोही चुकीच्या पद्धतीने वापरले जात असून, त्यांची सामाजिक प्रतिष्ठा धुळीस मिळवण्याचा प्रयत्न होत आहे.

## अमोल मिटकरींची लक्षवेधक कृती : अजित पवारांचा फोटो घेऊन एकटेच बसले

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र विधान परिषदेतील 9 आमदारांचा कार्यकाळ आज संपणार आहे. यात राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांचाही समावेश आहे. तत्पूर्वी, त्यांनी आज विधानभवनाच्या पायऱ्यांवर केलेल्या एका भावनिक कृतीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ते आज अजित पवारांचा फोटो हातात घेत चक्क विधानभवनाच्या पायऱ्यांवर एकटेच बसले. याद्वारे त्यांनी अजित पवारांप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली. तसेच त्यांच्या संशयास्पद मृत्यूवर विधानभवनात चर्चा न झाल्यावर आपली नाराजीही व्यक्त केली. त्यांचा हा क्षण उपस्थितांसाठी केवळ राजकीय नव्हे, तर भावनिकदृष्ट्याही लक्षवेधी ठरला. अजित



पवारांचे गत 28 जानेवारी रोजी बारामतीत झालेल्या एका विमान अपघातात निधन झाले. अमोल मिटकरी तेव्हापासून या अपघातावर संशय व्यक्त करत आहेत. त्यांनी या प्रकरणी सभागृहातही चर्चा करण्याची मागणी केली. पण अर्थसंकल्पीय अधिवेशन संपत आले असताना अद्याप त्यावर चर्चा झाली नाही. या पार्श्वभूमीवर अमोल मिटकरी आज थेट विधानभवनाच्या पायऱ्यांवर एकटेच अजित पवारांचा फोटो घेऊन बसले.

## माजी खासदार दत्ता मेघे यांच्या पार्थिवावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी वाहिली श्रद्धांजली

वर्धा (दै. संध्या)

- जन्मगावी पवनार येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार
- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मंत्री बावनकुळे, राज्यमंत्री भोयर, जयस्वाल यांची उपस्थिती

माजी खासदार तथा माजी राज्यमंत्री दत्ता मेघे यांच्या पार्थिवावर त्यांच्या जन्मगावी पवनार येथे आज शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अंत्यविधीला उपस्थित होते. दत्ता मेघे यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र वाहून मुख्यमंत्री व अन्य मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी मुख्यमंत्र्यांसह केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री तथा



जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, खासदार अमर काळे, आमदार सर्वश्री अभिजित वंजारी, आमदार समीर कुणावार, राजेश बकाने, चरण ठाकूर, माजी मंत्री रणजित देशमुख, माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज अहीर, विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, माजी राज्यमंत्री राजेंद्र मुळक, जिल्हाधिकारी वान्मथी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, माजी खासदार रामदास तडस, सुरेश वाघमारे, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांच्यासह माजी खासदार, आमदार व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. दत्तामेघे यांचे काल नागपूर येथे निधन झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन पार्थिवाचे दर्शन घेतले होते. आज मुख्यमंत्र्यांनी अंत्यविधीला उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी पोलिस दलाच्यावतीने बंदुकीच्या फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व अन्य मान्यवरांनी दत्ता मेघे यांच्या पत्नी शालिनीताई दत्ताजी मेघे, पुत्र सागर मेघे व आमदार समीर मेघे यांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले  वर्धा जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्ते, नागरीक दत्ताजी मेघे यांच्याशी जुळले होते. त्यांनी माझ्यासारखे अनेक आमदार, खासदार घडविले. राजकारणापेक्षा समाजकारणावर त्यांचा अधिक भर होता. प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी हे दाखवून दिले. त्यांच्या जाण्याने सामाजिक, राजकीय क्षेत्रासह वर्धा जिल्ह्याचे कधीही भरुन न निघणारे नुकसान झाले आहे, असे यावेळी शोक संवेदना व्यक्त करतांना राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले.

## शिवसेना मंत्र्यांचा राजीनामा देण्याचा इशारा : भाजपकडून गळचेपी सुरू, दुय्यम वागणूक मिळतेय

मुंबई (दै. संध्या)

सातारा जिल्हा परिषदेच्या राजकारणावरून सत्ताधारी शिवसेना आणि भाजपमधील वाद एकदम टोकाला जाताना दिसतोय. भाजपकडून आमची गळचेपी सुरू आहे. सत्ताधारी शिवसेनेचे आमदार आणि मंत्री यांना दुय्यम वागणूक मिळतेय. ही बाब आम्ही खपवून घेणार नाही. आम्ही राजीनामे देऊ, अशी सडेतोड भूमिका सत्ताधारी शिवेसनेचे मंत्री आणि आमदार यांनी शिवसेनेचे सर्वेसर्वा आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर मांडली. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीत मंत्री शंभूराजे देसाई यांना धक्काबुक्की झाली. त्याचे पडसाद आज सकाळपासून उमटत आहेत. राज्याच्या सत्तेत असणारे शिवसेना आणि भाजप हे मित्रपक्ष या निमित्ताने आमने-सामने आलेत. हा संघर्ष काय वळण घेतो, हे पाहावे लागेल. सातारा जिल्हा परिषद निवडणूक



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेसमोर मांडली खदखद

राड्याचे पडसाद आज विधिमंडळात जोरदार उमटले. सत्ताधारी शिवसेनेच्या आमदारांनी विधिमंडळासमोर निदर्शने केली. त्यानंतर विधानसभेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आक्रमक झाले. सातारा जिल्हा परिषदेमधील मतदानापासून वंचित ठेवण्याचा प्रकार हा लोकशाहीचा खून आहे, असा घणाघात त्यांनी केला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी चौकशी करू. दोषींवर कारवाई करू, असे आश्वासन दिले. दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या दालनात शिवसेनेच्या विधिमंडळ शिवसेना पक्षाची बैठक घेतली. या बैठकीतही मंत्री आणि आमदार आक्रमक झाले.

शिवसेना आमदारांनी एकनाथ शिंदे यांच्यासमोर आपली कैफियत मांडल्याचे समजते. सत्ताधारी आणि मित्रपक्ष भाजपकडून आपली गळचेपी सुरू असून, शिवसेनेचे मंत्री आणि आमदारांना दुय्यम वागणूक मिळते. हे सतत सुरू आहे. यावर आपण उघडपणे बोला. अन्यथा आम्ही राजीनामे देऊ, अशी आक्रमक भूमिका त्यांनी घेतली. एकनाथ शिंदे यांनी त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. या प्रकरणावरून आज तरी शिवसेनेने आक्रमक भूमिका घेत विधिमंडळात भाजपला खिंडीत गाठले. येणाऱ्या काळात सत्ताधाऱ्यांमधील हा राजकीय संघर्ष कसा वळण घेतो, हे पाहणे रंजक ठरेल. सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवड प्रक्रियेत भाजपने ऐतिहासिक विजय मिळवत पहिल्यांदाच आपली सत्ता प्रस्थापित केली. मात्र, या प्रक्रियेदरम्यान झालेल्या प्रचंड गोंधळात जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या डाव्या हाताला जखम झाली. भाजप कार्यकर्त्यांकडूनच धक्काबुक्की झाल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. गर्दीत सुरुवातीला नेमका धक्का कसा लागला हे समजले नाही. मात्र, जेव्हा रक्त येऊ लागले तेव्हा दुखापतीची जाणीव झाली, अशी पहिली प्रतिक्रिया देसाई यांनी दिली होती. या घटनेनंतर त्यांचे समर्थक कमालीचे आक्रमक झाले. या घटनेचे पडसाद आज विधिमंडळातही उमटले. शंभूराज देसाई म्हणाले, 'मी गेल्या 40 वर्ष राजकारणात आहे. कधीच पोलिसांकडून लोकप्रतिनिधींना हातापायी झाली नाही. अशा पद्धतीने दोन कॅबिनेट मंत्री, पोलिसांचा वापर, म्हणजे साताऱ्याचे एसपी घरगड्यासारखे वागले. आमचे बहुमत असताना देखील भाजपने आमच्या अनेक सदस्यांना नेले. तरीही मतदानाला जाताना एका गाडीतून 33 सदस्य घेऊन तिथे गेलो. मात्र, जे राष्ट्रवादीचे सदस्य आमच्यासोबत आहेत, त्यांचेच अपहरण झाल्याची तक्रार त्यांच्या मुलावर दबाव टाकून केली. आणि कोणी अपहरण केले, तर आमच्याच सदस्यांनी केले. ते दोन्ही सदस्य आमच्यासोबत होते. बर पोलिसांना अपहरण केलेल्या सदस्यांना खोटा आरोप असलेल्या सदस्यांना ताब्यात घ्यायचे होते, तर आमची पार्टी मीटिंग ज्या हॉटेलमध्ये चालू होती, त्याच्या खाली साध्या वेशात पोलिस होते. पण तिथे ताब्यात नाही घेतले. कारण तिथे शिवसेनेचे आणि राष्ट्रवादीचे हजार-2 हजार सैनिक उभे होते. आणि बरोबर मतदानाला जात असताना, मी तिथे होतो, मकरंद पाटील होते, तेव्हा अक्षरशः साध्या वेशातील पोलिसांनी झटापटी केली.

## राज ठाकरेंचा भोंदू खरात प्रकरणावर संताप : अजब ‘तीर्थ’ पिण्यासाठी अशोक खरातच्या भजनी लागणे हे भीषण

मुंबई (दै. संध्या)

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भोंदू अशोक खरात व त्याच्या नादी लागलेल्या राजकारण्यांवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांसारखे नेते व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यात संवाद असायचा,. पण आज त्याच महाराष्ट्रातील नेते तर्काला तिलांजली देऊन कुठले तरी अजब तीर्थ प्राशन करण्यासाठी अशोक खरातसारख्याच्या भजनी लागतात हे भीषण आहे, असे ते म्हणालेत. या प्रकरणात सहभागी असणाऱ्या सर्वांवर कारवाई करण्याची मागणीही राज यांनी केली आहे. राज ठाकरे आपल्या पोस्टमध्ये म्हणतात, अशोक खरात प्रकरणातले हिडीस



तपशील वाचून, शब्दशः गरगरल्यासारखं झालं. अवघ्या काही दिवसांपूर्वी १९ मार्च २०२६ ला आमच्या पक्षाच्या गुढी पाडवा मेळाव्यातून, महाराष्ट्राला किती सशक्त परंपरा लाभली आहे आणि या महाराष्ट्राने किती अद्वितीय माणसं या देशाला दिली आहेत याचं सादरीकरण केलं होतं. त्यात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम ते संत गाडगेबाबांपर्यंतचा ते अगदी आमचे आजोबा प्रबोधनकार ठाकरे या सगळ्यांनी मराठी मनाची कशी मशागत केली हे दाखवलं होतं. आणि त्याच महाराष्ट्रात जेंव्हा अशोक खरातसारखा नीच माणूस, राजकारण्यांच्या आशीर्वादाने धुमाकूळ घालतो तेंव्हा खरंच, 'कुठे नेऊन ठेवला आहे महाराष्ट्र' हा प्रश्न पडतो.

ते पुढे म्हणाले, ज्या महाराष्ट्रात राज्यकर्ते संताचा आशीर्वाद घ्यायचे, जिथे लोकमान्य टिळकांसारखे नेते भगवद्गीतेचा अर्थ लावणारा 'गीतारहस्य' सारखा ग्रंथ लिहायचे, ज्या महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांसारखे नेते आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यात संवाद असायचा, त्या महाराष्ट्रातले नेते तर्काला तिलांजली देऊन कुठलं तरी अजब 'तीर्थ' प्राशन करण्यासाठी अशोक खरातसारख्याच्या भजनी लागतात हे भीषण आहे. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनाचा आणि एकूणच विवेकाचा आवाज उठवला जायचा आणि त्यामुळेच डिसेंबर २०१३ ला महाराष्ट्र विधानसभेत अंधश्रद्धा निर्मूलन विधेयक पारित झालं होतं. त्यावेळेस ज्या आमदारांनी हे विधेयक पारित केलं असेल त्यातले अनेक जण आजदेखील आमदार असतील आणि त्यातले अनेक जणं या प्रकरणात अडकले असतील. हा किती दुर्दैवी विरोधाभास आहे आणि महाराष्ट्राचं किती अधःपतन झालं आहे याचं हे द्योतक आहे. राज ठाकरे म्हणाले, हा खरात स्त्रियांचं शोषण करतोय, ते झालं तरी चालेल, पण त्याच्या बदल्यात कुठल्यातरी शक्तीने तो आपलं भलं करेल असा अजब विश्वास आणि यासाठी लागणारा कोडगेपणा हे दोन्ही या राज्यात कुठून आला आहे हेच कळत नाही. आधी आमदार खासदारकीची तिकिटं मिळवण्याची धडपड. मग जिंकून येण्यासाठी वाट्टेल ते, मग मंत्रिपद. ते नाही

### आजही या राज्यात तर्काचा आवाज मोठा

या सगळ्याचा महाराष्ट्राच्या समाजमनावर काय परिणाम होतोय याचा विचार आतातरी होणार आहे का ? माध्यमं सध्या खरात प्रकरणाचा रोज पाठपुरावा करत आहेत हे चांगलं आहे पण म्हणून त्यांनी जनतेला पुन्हा एकदा आपण कोण होतो याचं दर्शन घडवायला हवं असं मला मनापासून वाटतं. गुढी पाडव्याच्या मेळाव्यातून मी हा महाराष्ट्र कोणी घडवला आहे याचं दर्शन मुद्दामून करवलं होतं, ती माझी समज काय आहे हे दाखवण्यासाठी नाही. तर आत्ताच्या तरुण पिढीला हे कळावं म्हणून. माझ्यापरीने हे काम मी करत राहणार आहेच. पण महाराष्ट्रातील जनतेने विचार करावा. हे असले लोकप्रतिनिधी तुम्ही निवडून देणार आहात. महाराष्ट्रातील गावागावांत आजही कीर्तनं होतात, ज्ञानेश्वरीचं पठण होतं, आजही या राज्यात तर्काचा आवाज मोठा आहे. पण जर तुम्ही या असल्या नाठाळांना आपले नेते मानणार असाल तर महाराष्ट्राचं काही खरं नाही हे नक्की, असे राज ठाकरे म्हणाले.

## संपादकीय

# घोषणा सोपी, कृती अवघड

बंदीने समस्या संपते का? कायद्याने लादलेली बंदी जास्त प्रभावी असते, की समाजप्रबोधनाने विचारपूर्वक समूळ नष्ट केलेलं तिचं अस्तित्व? कारण, कायदा आला, की त्यामागून पळवाटा येतात. कायदा तर्कशुद्ध करण्याच्या गरजेतून इतके प्रश्न निर्माण होतात, की त्यात मूळ कायद्याची व्यवहार्यताच बऱ्याचदा संपून जाते. जी गोष्ट व्यवहार्य नसेल, तिची अंमलबजावणी कशी होणार? इथे तर संबंध थेट बालमनाशी आहे. वयाच्या सुरुवातीच्या वर्षात मुलांची वाढ नीट व्हावी यासाठी त्यांचा 'स्क्रीन टाईम' कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याचा विचार सर्वप्रथम ऑस्ट्रेलियात झाला. ऑस्ट्रेलियानंतर इंडोनेशियाने त्याची री ओढली. दक्षिण कोरिया, सिंगापूर, फ्रान्स, स्पेन या देशांनीही त्यासाठी वेगवेगळ्या उपायांचं सूतोवाच केल्यानंतर आता संपूर्ण युरोपच समान उपाययोजनेच्या शक्यतेचा विचार करतो आहे. जी समस्या साऱ्या जगाला सतावते आहे, ती भारतासमोर नाही, असं कसं होईल? भारतातील एकूण लोकसंख्या आणि त्या लोकसंख्येतील किशोर-तरुणांची मोठी संख्या या समस्येला इथे कितीतरी पटीने मोठी करते. भारतात या प्रश्नाला सर्वप्रथम वाचा फोडली, ती कर्नाटकाने. परदेशातील विचारमंथनाचा परिणामही असेल, पण कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी आपल्या राज्यात १६ वर्षांखालील मुलांना समाज माध्यमं वापरण्यावर बंदी आणण्याची घोषणा केली. आंध्रचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनीही लगेच १३ वर्षांखालील मुलांच्या समाज माध्यम वापरावर बंदीची घोषणा केली. 'तीन महिन्यांत ही बंदी लागू होईल' अशी त्यासाठीची कालमर्यादाही त्यांनी जाहीर करून टाकली. या दोन राज्यांनंतर बिहारचे मावळते मुख्यमंत्री नितीशकुमार आणि आत्ताच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही 'आपलाही तसा विचार सुरू असल्या'चं बोलून दाखवलं. मुलांचा 'स्क्रीन टाईम' कमी करण्याची गरज जगभर कशी समान पद्धतीने जाणवते आहे, ते या सगळ्या घोषणांवरून दिसतं. कर्नाटक आणि आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी थेट बंदीचीच घोषणा केली असली, तरी ही बंदी नेमकी कशी प्रत्यक्षात आणणार, ते अद्याप स्पष्ट केलेलं नाही. कारण, डिजिटल जगात कोणतीही बंदी आणणं आणि तिची यशस्वी अंमलबजावणी करणं मोठं जिकिरीचं असतं. सरकारने आपली पूर्ण ताकद लावल्याशिवाय आणि देशाबाहेरून चालवण्या जाणाऱ्या प्लॅटफॉर्मचं सहकार्य मिळवल्याशिवाय अशी कुठलीही बंदी शक्य होत नाही, हा या पूर्वीचा अनुभव आहे. बंदीची घोषणा जितकी सोपी आणि आकर्षक, तेवढीच तिची अंमलबजावणी कठीण असते! यापूर्वी जगभर अनेकदा विचारला गेलेला प्रश्न यानिमित्ताने पुन्हा विचारला जातो आहे : बंदीने समस्या संपते का? कायद्याने लादलेली बंदी जास्त प्रभावी असते, की समाजप्रबोधनाने विचारपूर्वक समूळ नष्ट केलेलं तिचं अस्तित्व? कारण, कायदा आला, की त्यामागून पळवाटा येतात. कायदा तर्कशुद्ध करण्याच्या गरजेतून इतके प्रश्न निर्माण होतात, की त्यात मूळ कायद्याची व्यवहार्यताच बऱ्याचदा संपून जाते. जी गोष्ट व्यवहार्य नसेल, तिची अंमलबजावणी कशी होणार? इथे तर संबंध थेट बालमनाशी आहे. दुसऱ्या बाजूला तंत्रज्ञान आहे. माहिती तंत्रज्ञान इतक्या झपाट्याने नवनव्या गोष्टी येत आहेत, तंत्रज्ञान इतक्या वेगाने प्रगत होत आहे, की कोणीही म्हटलं तरी या तंत्रज्ञानाला आपल्या पकडीत ठेवून थांबवू शकणार नाही. यासंदर्भात याआधीही काही प्रयोग झाले आहेत. विशेषतः मुक्त लैंगिक आणि अश्लील चित्रफिती दाखवणाऱ्या डिजिटल प्लॅटफॉर्मसंदर्भात. आजही ओटीटीवरील अनेक वेब सिरीज, चित्रपट प्रौढांसाठी असतात. ते पाहण्यासाठी तिथे गेलं, की दर्शकाला आधी त्याचं वय विचारलं जातं. दर्शकाने सोयीनुसार आपलं वय नोंदवलं, की त्या "प्लॅटफॉर्म"ची सगळी दारं दर्शकासाठी क्षणात खुली होतात. दर्शकाने टाकलेलं त्याचं वय खरं, की खोटं हे तपासण्याची कुठलीही सोय तिथे नाही. त्यामुळे, आजही अडसर आहे; पण तो अगदी सहजपणे बाजूला करता येईल असाच ठेवला आहे. ज्या राज्य सरकारांनी आता बंदीची घोषणा केली आहे, त्यांना या बाबी लक्षात घेऊन सहजासहजी दूर करता येणार नाही, असा अडसर घालावा लागेल! हे 'प्लॅटफॉर्म' उघडण्यासाठी असणारी व्यवस्था आधार कार्डाशी जोडण्यासारख्या पर्यायांचा विचार केला, तरच ही बंदी खऱ्या अर्थाने अमलात येईल.


## गुरु वचन

### जीवनाचे सार : चार गोष्टी

जगातल्या प्रत्येक अडचणीची उकल शक्य आहे. मानव तर विशेष शक्तींचा धनी आहे. जर मानवाकडे सातत्य, निष्ठा व प्रयत्न करण्याची क्षमता असेल तर त्यासाठी सर्व सोपे आहे. जीवनाला निरुपयोगातून उपयोगी बनवण्यासाठी अनेक उपाय आहेत. त्यापैकी चार गोष्टी अशा आहेत, ज्यांचा जीवनात समावेश केल्याने अडचणींचे समाधान होऊ शकते. या चार गोष्टींना जीवनाचे सार किंवा आधार सुद्धा म्हटले जाऊ शकते. सर्व प्रकारच्या विकारांचा त्याग, मिथ्यत्व सोडून साधेपणा ग्रहण करणे आहे, बंधने झुगारुन साहस व जीवनात अध्यात्माचा समावेश केला तर मनुष्याचे निरुपयोगी जीवन उपयोगी बनेल. त्याच्या जीवनात असंतोषाचा नाश होईल. त्याबदल्यात त्याच्या जीवनात आनंद, उत्साह, शांतता व समाधानाची वृद्धी होईल.

विकार मानवी जीवनातील सर्वात मोठा अडसर आहे. जो मानवास फक्त विकृती देतो तसेच उदारता, दान, दया, प्रेम या प्रवृत्तींना वंचित करतो. म्हणून त्याच्या भौतिक इच्छा इतक्या बळावतात की, संग्रह करणे मग ते योग्य–अयोग्य, कर्तव्य–अकर्तव्य, नातेवाईक–त्रयस्त, शोषण–पोषण याचा अजिबात विचार करत नाही. आपला फायदा व मोहासमोर त्यास सर्व आदर्श, मर्यादा व धोरणे क्षुल्लक वाटू लागतात. अशाप्रकारे विकारांनी पिडीत मनुष्याच्या जीवनात शोक–संताप व अशांतता, असंतोषाशिवाय कुणाला आनंदाची संधी मिळू शकते? विकृती मनुष्याचा फार मोठा दोष आहे, याचा तात्काळ त्याग केला पाहिजे. उदारता व महानतेची वृत्ती मनुष्याचे दोन दागिने मानले गेले आहेत. उदारतेचा गुण आपल्यातील इतर गुण त्यागण्यास प्रोत्साहित करतो. त्याग तपश्चर्येपेक्षा कमी नसतो. त्यागी पुरुष कुठल्याही वस्तुचा संग्रह धोरण व आदर्शा व्यतिरिक्त करत नाही. उदारता पुरुष मोक्षासाठी अंगीकारतो. उदार पुरुष धोरणाने मिळवलेल्या धन–धान्याने सुखी व समाधानी राहतो. अशा लोकांची प्रत्येक अडचण आपोआप सुटत राहते.

## उपदेशकथा



### ऐट

एका गृहस्थाच्या घरी एक दिवस एक खास मित्राला मेजवानी होती. त्याचा एक कुत्रा होता. त्यानेही आपल्या एका दोस्त कुत्र्याला त्याच दिवशी आपल्याकडे जेवणाचे आमंत्रण दिले. तो कुत्रा जेव्हा आला तेव्हा तयार होत असलेले चमचमीत जेवणाचे पदार्थ पाहतच राहिला. त्याला आनंदाच्या उकळ्या फुटू लागल्या तो म्हणाला, काय मस्त मेजवानी मिळणार आज. अगदी पोट फुटेपर्यंत मी आज खाणार आहे. मग पुन्हा परवा सकाळपर्यंत पुन्हा खायला नको.

आपल्या मित्रांवरच प्रेम दाखविण्याकरता तो आपली शेपटी हालवत राहिला. पण त्या शेपटीच्या वळवळ्यामुळे तिथल्या स्वयंपाक्याचे लक्ष त्याच्याकडे गेले आणि त्याने ताबडतोब त्याचे पाय धरून त्याला घराबाहेर फेकून दिले. अर्थात रागाने आणि निराशेने भूकंत भूकंत तो आपल्या घरी निघाला. वाटेत त्याला त्याचा दुसरा मित्र भेटला. त्याने विचारले, काय कसं काय होत जेवण? काही विचारू नको, तो म्हणाला, अरे, तेथे इतकी दारू होती की, मी तिच्यावर ताव मारला. त्या घरातून मी कसा बाहेर पडलो ते देखील मला समजत नाही.

कथा उपदेश : दुसऱ्याच्या जीवावर जे जे आपल्याला चांगल्या गोष्टी देण्याचा आव आणतात त्यांच्यावर विश्वासून चालणे बरे नाही.

## पंचांग

| | |
|---|---|
| २४ मार्च २०२६ | ३०:०१:४२+ |
| मंगळवार | करण:तैतिल १६:०८:०६ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:गर २६:५७:२१+ |
| चैत्रशके संवत्– १९४८ | सूर्य:मीन |
| संवत्सर – पराभवनाम | चन्द्र:वृषभ |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– फाल्गुन | मुस्लिम मास – शव्वाल |
| ऋतु– सौर वसंत | तारीख – ४ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:षष्टी १६:०८:०६ | नाईकबा पालखी |
| नक्षत्र:रोहिणी १९:०४:३८ | सोहळा – बनपुरी कराड |
| योग:प्रीति ०९:०६:५९ | महाकाली यात्रा – |
| योग:आयुष्मान | चंद्रपूर प्रारंभ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८९६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 6 | 9 | 5 | | | | | |
| | 8 | | | 7 | 9 | | 2 | 1 |
| | | 7 | 2 | | | | 4 | 6 |
| | 2 | 1 | 9 | | | | | |
| 7 | | 4 | | | | 6 | | 5 |
| | | | | | 6 | 2 | 7 | |
| 3 | 7 | | | | 4 | 8 | | |
| 9 | 4 | | 7 | 8 | | | 5 | |
| | | | | | 5 | 4 | 6 | 7 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. ८९५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 2 | 5 | 8 | 6 | 4 | 7 | 1 | 3 |
| 4 | 1 | 6 | 2 | 3 | 7 | 8 | 9 | 5 |
| 7 | 8 | 3 | 1 | 5 | 9 | 6 | 4 | 2 |
| 1 | 3 | 4 | 6 | 9 | 2 | 5 | 8 | 7 |
| 5 | 7 | 2 | 4 | 8 | 1 | 9 | 3 | 6 |
| 6 | 9 | 8 | 3 | 7 | 5 | 1 | 2 | 4 |
| 2 | 4 | 7 | 5 | 1 | 8 | 3 | 6 | 9 |
| 3 | 5 | 1 | 9 | 4 | 6 | 2 | 7 | 8 |
| 8 | 6 | 9 | 7 | 2 | 3 | 4 | 5 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९११ – डेन्मार्कने मृत्यूदंड रद्द केला. असे करणारा तो पहिला देश आहे.
- १९३३ – आयसीआयच्या प्रयोगशाळेत पॉलीएथिलीनचा शोध.

### राष्ट्रीय

- १९७७ – जनता सरकारचे सत्ताग्रहण, मोरारजी देसाई पंतप्रधान बनले.
- २००३ – नंदी मार्ग येथे २४ काश्मिरी पंडितांची अतिरेक्यांकडून हत्या.
- २००७ – विशेष न्यायालयाने बनावट मुद्रांक घोटाळ्यातील प्रमुख आरोपी अब्दुल करीम तेलगी आणि त्याच्या चार साथीदारांना दहा वर्षांची शिक्षा ठोठावली.
- २००८ – शिवानी भटनागर हत्या प्रकरणात दोषी आढळलेल्या रविकांत शर्मा (आर. के. शर्मा) आणि अन्य तिघांना दिल्लीच्या एका सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

### जन्म

- १८३४ – लेखक, कवी आणि कलाकार विल्यम मॉरिस या इंग्रजाचा जन्म.
- १९०१ – पडद्यावर मिकीमाऊसला जिवंत करणाऱ्या यूबी आयवर्क्स या चित्रकाराचा जन्म.

### निधन

- १६०३ – राणी पहिली एलिझाबेथचा मृत्यू. यामुळे स्कॉटलंडचा सहावा जेम्स इंग्लंडचा पहिला जेम्स बनून गादीवर बसला. त्याने स्कॉटलंडचे एकत्रीकरण केले.
- १७७६ – रेखांश सांगण्यासाठी उपयुक्त असे अचूक वेळ दाखवणारे घड्याळ निर्माण करणाऱ्या जॉन हॅरिसनचा मृत्यू.
- १८८२ – हेन्री वॅड्सवर्थ लाँग फेलो या अमेरिकन कवीचे निधन.
- १८८४ – फ्रॉंस्वा मिन्ये या फ्रेंच इतिहासकाराचे निधन.

## : SMS :

A negro attended a function without dress. sardar thought he was wearing black suit & said "ur dress is good but tie is in the wrong position"

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.९ | १९.२ |
| अहमदनगर | ३०.९ | १८.५ |
| अकोला | ३२.६ | २०.२ |
| अमरावती | ३१.८ | २०.१ |
| बीड | ३३.४ | २१.७ |
| भंडारा | ३१.८ | १८.८ |
| बुलढाणा | २७.९ | १३.६ |
| चंद्रपूर | ३३.५ | २१.६ |
| चेन्नई | ३६.८ | २९.४ |
| नवी दिल्ली | २८.२ | १६.३ |
| धुळे | ३१.९ | २०.४ |
| गोंदिया | ३०.५ | १८.३ |
| जळगाव | ३२.६ | १८.५ |
| कोल्हापूर | ३२.५ | १८.२ |
| लातूर | ३२.२ | २०.१ |
| मुंबई | ३४.७ | २५.५ |
| नागपूर | ३१.२ | २०.१ |
| नांदेड | ३३.९ | २१.३ |
| नंदूरबार | ३०.१ | २२.३ |
| नाशिक | ३१.४ | १९.१ |
| पुणे | ३०.९ | २०.४ |
| पंढरपूर | ३४.३ | २१.९ |
| सातारा | ३२.२ | १७ |
| सांगली | ३३.१ | २०.५ |
| सोलापूर | ३४.३ | २१.७ |
| वर्धा | ३२.६ | २०.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** न्याय प्रविष्ठ प्रकरणातून लाभ होतील. थोरा–मोठयांच्या सहकार्याने आपली रेंगाळलेली कामे मार्गी लागतील.

**वृषभ :** कर्जप्रकरणे मंजूर होतील. जोडधंद्यातून चांगली आर्थिक प्राप्ती होईल. कौटुंबिक शुभ–समारंभाचे आयोजन केले जाईल.

**मिथुन :** शेजाऱ्यांचे सहकार्य लाभेल. सांस्कृतिक कार्यक्रमात सक्रीय सहभाग घ्याल. जाणीवपूर्वक आपल्या विचारात बदल करण्याचा प्रयत्न करावा.

**कर्क :** जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलावा. सामाजिक क्षेत्रातील आपल्या आघाडीच्या नेतृत्वामुळे समाजात प्रतिष्ठा उंचावेल.

**सिंह :** आत्मविश्वास व मनोबल उत्तम राहील. मिळालेल्या संधींचा लाभ आपले भविष्य उज्वल करणारा राहील. आर्थिक आवक वाढेल.

**कन्या :** साचेबद्ध जीवनातून विरंगुळा मिळावा म्हणून सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घ्याल. अचानक सहलीचे आयोजन केले जाईल.

**तुळ :** प्रगतीपथावर मार्गक्रमण करण्यासाठी सतत नवीन योजनांची आखणी कराल. समाजात आपल्या मतांचा आदर होईल.

**वृश्चिक:** मित्रपरिवाराचे सहकार्य लाभेल. आकर्षक भेटवस्तू मिळतील. सुग्रास भोजनाचे बेत आखले जातील. नवीन परिचय होतील.


**धनु :** व्यवसाय उद्योगात मोठया प्रमाणात गुंतवणूक केली जाईल. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन आपल्या व्यावसायिक उत्पन्नाचा दर्जा सुधारला जाईल.

**मकर :** कामाच्या विस्ताराचा सतत ध्यास घ्याल. उधारी उसनवारी वसूल होईल. स्वसंपादीत धनाचा उपभोग घेता येईल. समाधान लाभेल.

**कुंभ :** व्यवसाय उद्योगाच्या निमित्ताने देशातील तसेच परदेशातील संस्थांशी संपर्क साधण्यात यशस्वी व्हाल. अनपेक्षित चांगल्या गोष्टी घडतील.

**मीन :** भावाबहिणींशी वागताना भावनिक उद्रेक होणार नाही याची दक्षता घ्या. जवळचे प्रवास सुखकर होतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८९६



### आडवे शब्द

१. गाळ पण टाकाऊ नाही
२अ. ताळतंत्र सुटलेला
५. रोड टॅक्स–मराठीत
८. तोंडाचा पट्टा
११. पुरणपोळीबरोबर केली जाणारी आमटी
१२. अटीची भाषा
१४. चीज, वस्तू
१५. त्याग केला
१७. अर्धांगवायू
१९. ढीग
२१. सत्ता
२३. उत्तराधिकारी
२४. वाघाची मावशी
२५. शेवट, नाश
२६. मालक, सरदार, शासनसत्ता
२८. पाण्यापासून उत्पन्न
३१. चामखीळ
३३. एकरूप
३४. झाडाचे टॉनिक
३५. सरस्वती (ग्रा.)
३६. बातमी
३७. वारा, त्रास
३८. भांडण
४०. कैफ, धुंदी
४२. कधी मर्दानगीचे कधी भिकारपणाचे लक्षण
४३. नऊ भावना
४५. कडक व चिवट
४६. एक देवयोनी, स्वर्गातील गायक
४७. संत, अवलिया
४८. रागाचा ठिकाणा
४९. गंमत, मजा
५०. स्वयंपाकी
५३. आवाजांचा गोंधळ
५४. सन्मानाची रक्कम
५६. खोदकाम
५८. पुत्री, मुलगी
६०. लाकडी जिना
६२. दात
६४. जबरदस्त, धिप्पाड
६७. चेहऱ्यावरील कांती
६८. काळ्या तोंडाचे माकड
७०. राजपुत्र सलीमची प्रेयसी
७२.सवाद्य
७४. हिंदीत झणझणीत
७५. गायीचे पिल्लू
७७. शिक्षा
७८. मोगऱ्याची माळ
८०. खूळ
८२. अगदी सरळ
८३. दुसऱ्याच्या मनातील जाणणारा
८४. रश्शावरील तवंग, कट

### उभे शब्द

१. उमदा, रंगेल
२. बतावणी
३. आलेख– चढता वा उतरता, ४. पुरुष
५. घागरा
६. बटवा
७. रमापती
८. पृथ्वी, गाय
९. पूर्ण भरतीची वेळ
१०. सिंह
१३. समशेर
१६. पुत्र (हिंदी)
१८. दिवस
२०. लिंबू पाणी
२२. गंध
२४. पतंगाचा धागा
२५. अकस्मात
२६अ. ईदने सांगता होणारा उपवासाचा महिना
२७. खोकला
२८. पाणी देणारा
२९. फळातील द्रव
३०. वस्ती
३२. जास्तीत जास्त व कमीत कमी
३३. टोळीचा प्रमुख
३४. धोकादायक
३७. संधी
३९. बरोबर आलेला फौजफाटा
४१. शिक्षा
४३. पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना
४४. संपूर्ण
५०. घराणे
५१. शर्करा
५२. पाडाव, हार
५५. फायदा
५७. पुरुष
५९. वनवास
६१. दार
६३. हुण्डा (हिंदी)
६५. घरंदाज, कुलीन स्त्री
६६. टपालकचेरी
६९. मत देणे
७१. मुंग्यांचे घर
७३. धट्टकट्टा
७६. फटाक्यांची माळ
७७. उथळ पसरट वाटी
७९. रात्र
८१. निर्माण झालेले अंतर

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ८९५ चे उत्तर

आडवे उत्तर : १.कसम ४.तेंडुलकर ८.हरहर १२.पारावार १३.रमणीय १४.राजधानी १६.काकीनाडा १८.गरम १९.मज २१.समय २३.खोलणे २५.गावकुटाळ २६.रद २७.पारवा ३०.काका ३१.पारा ३२.दमट ३४.कसर ३७.सनदशीर ३८.पायल ३९.पसायदान ४१.कोमल ४३.चाक ४४.मात्रा ४५.रस्सी ४६.लवलव ४७.वरवर ५०.रंभा ५१.आवळा ५२.वसाहत ५५.रत्न ५६.भार ५७.तपन ५८.विनाकारण ६०.शहर ६२.पाक ६३.राम ६५.रवाना ६६.वडीलधारी ६८.तडकाफडकी ७१.तसदी ७४.रसकस ७७.तरुण ७८.वनमाला ७९.रविवार

उभे उत्तर : १.कपार २.सरा ३.मवाली ५.डुलकी ६.कारडा ७.रम ८.हयगय ९.हरामखोर १०.रज ११.धनी १५.धावणे १६.काजळ १७.नाठाळ १९.पाव २०.मटार २१.सरकार २२.मद २४.लवाद २५.गायक २७.पारायण २८.खोट २९.मनन ३०.काशीयात्रा ३१.पापा ३३.मखमल ३५.सपक ३६.रसा ३७.सदाशिव ४०.कारभार ४१.कोवळा ४२.लवकर ४३.चाकवत ४६.लवकुश ४७.वहन ४८.रत ४९.रचना ५३.सापशिडी ५४.फारकत ५६.भारवाहक ५८.विपरीत ५९.कापा ६१.हर ६३.राका ६४.मफलर ६६.वसंत ६७.लक्ष्मण ६९.डगला ७०.कीरवा ७२.सव ७३.दीन ७५.सर ७६.सर्दी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.



## नगरसेवक सनी निम्हण यांच्या प्रयत्नातून औंध–डेक्कन बससेवा पुन्हा सुरू

**पुणे (दै. संध्या) :**

पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल) तर्फे औंध ते डेक्कन जिमखाना दरम्यान धावणारी १०५ क्रमांकाची बससेवा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. मागील काही महिन्यांपासून हा मार्ग बंद असल्याने औंध-बाणेर परिसरातील नागरिकांकडून सातत्याने सेवा सुरू करण्याची मागणी होत होती. नगरसेवक चंद्रशेखर उर्फ सनी निम्हण यांच्या पाठपुराव्यामुळे अखेर ही बससेवा पुन्हा सुरू झाली आहे.

आज सकाळी सुमारे ८.१५ वाजता पहिल्या बसचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या वेळी पीएमपीएमएलचे संचालक अजय खेडेकर, उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक सनी निम्हण, नगरसेविका भक्ती गायकवाड, सपना छाजेड यांच्यासह आनंद छाजेड, शिरीष नाईकरे, रिपाई शिवाजीनगर युवक अध्यक्ष महादेव साळवे, मनोज दळवी, वसंत जुनावणे, निलेश गायकवाड, सुजाता पाटील, सूर्यकांत कळापुरे, सतीश तारू, मारुती पाटील, जॉन प्रकाश, मंगल जाधव, सुरेखा कुलकर्णी तसेच स्थानिक नागरिकआणि पीएमपीएमएल अधिकारी उपस्थित होते.

डीपी रोड परिसरात अनेक वर्षांपासून बंद असलेली ही बससेवा पुन्हा सुरू झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. ही सेवा सकाळी ५.३० ते रात्री ८.१५ पर्यंत सुरू राहणार असून या मार्गावर दररोज आठ फेऱ्या होणार आहेत. त्यामुळे औंध-बाणेर ते डेक्कन परिसरातील प्रवास अधिक सोयीस्कर होणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### नगरसेवकांचा तिकीट काढून प्रवास

पीएमपीच्या नवीन बस मार्गाचा शुभारंभ झाला की अधिकारी, नेते हिरवा झेंडा काढून थांबतात. मात्र आज सनी निम्हण, पीएमपीएमएलचे संचालक अजय खेडेकर, उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेविका भक्ती गायकवाड, सपना छाजेड यांच्यासह आनंद छाजेड यांनी तिकीट काढून पहिल्या बस फेरी मध्ये सामान्य नागरिकांसोबत प्रवास केला.

# रिपब्लिकन पक्षाला राष्ट्रीय पक्ष मान्यता मिळवून देणार

### रामदास आठवले यांचा निर्धार

**पुणे (दै. संध्या) :**

रिपब्लिकन पक्षाला सर्वसमावेशक स्वरूप प्राप्त करून देऊन राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवून देण्याचा निर्धार आठवले गटाचे प्रमुख व केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केला. पाच राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकींपैकी चार राज्यात रिपब्लिकन पक्ष आपले उमेदवार उभे करणार असल्याचेही त्यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.

यावेळी आरपीआय चे पुणे शहर अध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरोदे, जनरल सेक्रेटरी गौतम सोनवणे, सचिव बाळासाहेब जानराव, उपमहापौर परशुराम वाडेकर, चंद्रकांता सोनाकांबळे, सूर्यकांत वाघमारे, महिपाल वाघमारे, नीलेश अल्हाट, हिमाली कांबळे, निशा मानवतकर, बसवराज गायकवाड, विशाल शेवाळे, जयदेव रंधवे, नीलेश रोकडे, सचिन मानवतकर, विरेन साठे आदि पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

रिपब्लिकन पक्ष हा सर्व जाती धर्मांचा, समाजातील उपेक्षित वर्गाचा, तरुणांचा महिलांचा पक्ष असून त्याला सर्वसमावेशक स्वरूप देण्याचे कार्य हाती घेणार असल्याचे आठवले यांनी सांगितले. तामिळनाडू, आसाम, केरळ आणि पद्दूचेरी या राज्यात आपला पक्ष विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभा करणार आहे, असेही ते म्हणाले.

रिपब्लिकन पक्षाच्या निवडक कार्यकर्त्यांचा मेळावा पोर्ट ब्लेअर येथे आयोजित केला जाणार असून त्यात पक्ष विस्ताराच्या दृष्टीने धोरण निश्चित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पुण्यात देखील बैठक घेऊन पक्ष विस्ताराच्या दृष्टीने नियोजन करण्यात येणार आहे, असेही आठवले यांनी सांगितले. समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी राजकीय पक्षांबरोबरच स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते आणि सर्व नागरिकांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता ही त्यांनी व्यक्त केली.

मुंबई महापालिका निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला महायुतीकडून जागा मिळाल्या नसल्या तरीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेची एक जागा, दोन महामंडळाचे अध्यक्षपद आणि पुरेशा प्रमाणात महामंडळांची सदस्य पदे देण्यात येतील अशी ग्वाही दिली असल्याचेही आठवले यांनी नमूद केले.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत घातपाताची शक्यता आपल्याला वाटत नाही. मात्र, या विमान अपघाताची सखोल चौकशी व्हावी, संबंधित विमान कंपनीवर कठोर कारवाई व्हावी अशीच आपली देखील मागणी असल्याचे आठवले यांनी सांगितले.

भोंदू बाबा कॅप्टन अशोक खरात प्रकरणाबाबत बोलताना, राज्यातील सर्वच भोंदू बाबांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करतानाच मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यासाठी पुढाकार घेतल्याचे आठवले म्हणाले. कॅप्टन खरात याच्या गुन्ह्यांची व्याप्ती बघता त्याला फाशीची शिक्षा व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



### संजय सोनवणे हेच पक्षाचे अधिकृत शहराध्यक्ष

पुणे शहरात रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे दोन शहराध्यक्ष असल्याबाबत विचारणा केली असता, संजय सोनवणे हेच निवडून आलेले पक्षाचे अधिकृत शहराध्यक्ष असल्याचे आठवले यांनी स्पष्ट केले. इतर कोणी शहराध्यक्ष पदाचा दावा करीत असेल तर ते घटनाविरोधी आहे. सोनवणे हे कार्यकर्त्यांनी निवडून दिलेले अध्यक्ष असून त्यांचा तीन वर्षांचा कालावधी आहे. त्यापैकी पावणे दोन वर्ष पूर्ण झाली आहे. तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर निवडणुकीद्वारेच नवीन शहराध्यक्ष निवडला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

### अनेक कार्यकर्त्यांचा रिपब्लिकन पक्षात प्रवेश

आज मदासजी आठवले यांच्या हस्ते विविध पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा रिपब्लिकन पक्षात प्रवेश झाला. यामध्ये हुलगेश मर्याप्पा चलवादी. (माजी प्रदेश प्रभारी, बीएसपी ) अनिल कुमार त्रिपाठी. पुणे जिल्हा प्रभारी, बीएसपी. भीम सिंह चलवादी. (अध्यक्ष, कर्नाटक आंध्र तेलंगणा राज्य, चलवादी माळा विकास महासंघ), दीप चिंचोलीकर (हायकोर्टाचे वकील) मूळ, लातूर बीएसपी चे लोकसभा उमेदवार, अविनाश इंद्रजीत मस्के (निवृत्त, आयपीएस अधिकारी.), विकास जावळे (निवृत्त, प्रॉव्हिडंट फंड कमिशनर) महाराष्ट्र राज्य., प्रकाश सोनवणे. सुधीर वाघमोडे. संतोष आरडे. (माजी नगरसेवक) यांचा समावेश आहे. हे पक्ष प्रवेश घडवून आणण्यासाठी प्रदेश सचिव बालासाहेब जानराव ,पुणे शहर अध्यक्ष संजय सोनवणे यानी विशेष प्रयत्न केले.

## ताल–सुरांच्या मिलाफाने पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाची बहारदार सांगता

**पुणे (दै. संध्या) :**



तबल्याच्या सुमधुर तालावर फिरणारी पावले, त्यातून साकारलेले अप्रतिम कथक नृत्य, संतूरच्या मंद सुरांनी प्रफुल्लित झालेले वातावरण आणि सुस्वर गायन अशा सुर, ताल आणि लय यांच्या त्रिवेणी संगमातून विसाव्या पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाचा बहारदार समारोप झाला.

तरंगिनी सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि 'आपला परिसर' संस्थेतर्फे कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित या महोत्सवाच्या शेवटच्या सत्रात ज्येष्ठ कथक नृत्यांगना नयनिका घोष, पद्मश्री पंडित सतीश व्यास (संतूर) आणि ज्येष्ठ गायिका श्रुती सडोलीकर-काटकर यांच्या सादरीकरणाने रसिकांना अविस्मरणीय अनुभव दिला.

शेवटच्या सत्राची सुरुवात नयनिका घोष यांच्या कथक नृत्याने झाली. धमार रागातील बंदिशींवर आधारित त्यांच्या नृत्याने सुरुवातीलाच प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. 'आज खेलो शाम रंगोली' या ठुमरीद्वारे त्यांनी होळीचा रंगतदार आविष्कार सादर करत श्रीकृष्ण विषयक गीत-नृत्याचा सुंदर संगम उलगडला. त्यांच्या सादरीकरणाला कार्तिक स्वामी (तबला), आशिष गंगावणे (पखवाज), यशवंत थिटे (हार्मोनियम) आणि अर्पिता वैशंपायन (स्वरसाथ) यांची उत्तम साथ लाभली. यावेळी माजी उपमहापौर अंकुश काकडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यानंतर पद्मश्री पंडित सतीश व्यास यांनी संतूर वादनाने मैफिलीला उंची दिली. धनकोरी कल्याण रागातील त्यांच्या सादरीकरणाने सभागृहातील वातावरण अधिकच भारावून गेले. रोहित मुजुमदार (तबला) यांनी त्यांना समर्थ साथ दिली. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

महोत्सवाची सांगता ज्येष्ठ गायिका श्रुती सडोलीकर-काटकर यांच्या प्रभावी गायनाने झाली. त्यांच्या सुरेल सादरीकरणाला सुधीर नायक (हार्मोनियम) आणि भरत कामत (तबला) यांनी साथ दिली.

याच वेळी ज्येष्ठ हार्मोनियम वादक प्रमोद मराठे यांना 'पंडित मंगेश मुळे संगतकार पुरस्कार' श्रुती सडोलीकर-काटकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

संपूर्ण महोत्सवाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, सुर-ताल-लय यांच्या अद्भुत मिलाफाने सजलेल्या या महोत्सवाने शास्त्रीय संगीताची समृद्ध परंपरा पुन्हा अधोरेखित केली.

## एसबीआय ग्रीन मॅरेथॉन सीझन 6 मध्ये पुण्याची हरित उद्याच्या दिशेने धाव




**पुणे (दै. संध्या) :**

लखनौ, चंदीगड, भोपाळ, विशाखापट्टणम, बेंगळुरू, गुवाहाटी, कोलकाता, अहमदाबाद, तिरुवनंतपुरम, जयपूर, पटना, मुंबई, चेन्नई, हैदराबाद, भुवनेश्वर आणि नवी दिल्ली यांसारख्या शहरांमध्ये प्रभावी हरित चळवळ उभारल्यानंतर, एसबीआय ग्रीन मॅरेथॉन सीझन 6 ने उत्साही पुणे शहरात आगमन केले.

ताजेतवाने रविवारी सकाळी पीडब्ल्यूडी ग्राउंड येथे फिटनेस, सामुदायिक एकात्मता आणि पर्यावरण जागरूकतेचा उत्साहपूर्ण

**फिटनेस आणि शाश्वततेचा संगम**

माहोल निर्माण झाला. हजारो उत्साही धावपटूंनी एकत्र येत शाश्वततेसाठी धावण्याचा आणि हरित उद्यासाठी योगदान देण्याचा संकल्प केला. फिटनेस संस्कृती, सक्रिय रनिंग कम्युनिटी आणि शाश्वत जीवनशैलीवर वाढता भर यासाठी ओळखले जाणारे पुणे या देशव्यापी हरित उपक्रमासाठी आदर्श ठरले. शहरातील उत्साह आणि सहभागाने "हरित भारतासाठी धावा" या मॅरेथॉनच्या मूलभूत संकल्पनेला साजेशी साथ दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### पोलिसांवर समाजवादी पक्षाचा सवाल; आरोपींना अटक न झाल्याने धरणे आंदोलन

पुणे (दैनिक संध्या) : सासवडजवळील ऑस्करवाडी तलाव परिसरात मुस्लिम बांधवांवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी आरोपींना अद्याप अटक न झाल्याने समाजवादी पक्षाने पुणे ग्रामीण पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. "पुणे ग्रामीण पोलिसांच चाललंय काय?" असा सवाल करत पक्षाचे पुणे शहराध्यक्ष जांबुवंत मनोहर यांनी प्रशासनावर टीका केली. या प्रकरणी गुन्हा दाखल होऊन आठवडा उलटूनही आरोपींना अटक न झाल्याच्या निषेधार्थ समाजवादी पक्षाच्या वतीने पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. तसेच या घटनेत खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. या आंदोलनात पुणे शहराध्यक्ष जांबुवंत मनोहर, प्रदेश सरचिटणीस अनिस अहमद, शहर सरचिटणीस दत्ता पाकिरे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य विनायक लांबे, अशोकराव गायकवाड, शहर संघटक प्रकाश डोंबाळे, जावेद शेख, अझिम शेख, भारत मालुसरे, शमिम पठाण, सलिम शेख, राहुल ससाणे, अजित जाधव, जय काटे, नइम शेख, दस्तगीर शेख यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. दरम्यान, काही दिवसांपूर्वी बोगदेव घाटात घडलेल्या महिला अत्याचार प्रकरणात पुणे ग्रामीण पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपींना अटक केली होती. मात्र या प्रकरणात अद्याप कारवाई का होत नाही, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. "या घटनेत सरकारचा दबाव आहे का?" अशी शंका प्रदेश सरचिटणीस अनिस अहमद यांनी व्यक्त केली. या प्रकरणी तातडीने कारवाई करून आरोपींना अटक करावी, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा समाजवादी पक्षाने दिला आहे.

### आता सभापतीपदासाठी मोर्चेबांधणी; मिलिंद वाळंज यांचे नाव आघाडीवर



**संतोष राऊत, तुषार थोरात,अमोल नलावडे यांच्या नावांची चर्चा**

पुणे (दैनिक संध्या) : पुणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाची निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर आता सर्वांचे लक्ष विषय समिती सभापतींच्या निवडीकडे लागले आहे. अध्यक्षपदी वीरधवल जगदाळे (दौंड) आणि उपाध्यक्षपदी विवेक वळसे-पाटील (आंबेगाव) यांची वर्णी लागल्याने, आता प्रादेशिक समतोल साधण्यासाठी मुळशी , मावळ तालुक्याला झुकते माप मिळण्याची शक्यता आहे. यामध्ये पौड गटाचे तरुण सदस्य आर्किटेक्ट मिलिंद वाळंज यांचे नाव अग्रक्रमाने चर्चेत आहे. जिल्हा परिषदेत अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे निर्विवाद वर्चस्व असून, बांधकाम, समाजकल्याण, महिला व बालकल्याण आणि कृषी व पशुसंवर्धन या चार समित्यांच्या सभापतीपदासाठी इच्छुकांनी जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत. सर्व समित्या ग्रामीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या मानल्या जातात . अध्यक्ष उपाध्यक्ष पद अनुभवी नेतृत्वाखाली दिल्याने खालील समित्यांसाठी युवा उमेदवारांची वर्णी लागण्याची शक्यता आहे . मिलिंद वाळंज , संतोष राऊत , तुषार थोरात , अमोल नलावडे यासारख्या युवा चेहऱ्यांना संधीची शक्यता असून त्यामध्ये मिलिंद वाळंज हे स्वतः आर्किटेक्चर पदवीधारक असून त्यांना उद्योग आणि सामाजिक क्षेत्राचा दांडगा अनुभव आहे.

## महावितरणच्या वीजसेवा आता 'व्हॉट्सॲप'वर

**पुणे (दै. संध्या) :**


**वीजबिलाची माहिती, भरणासह तक्रार नोंदविण्याचीही सोय**

दिवसेंदिवस महावितरण स्मार्ट होत चालले असून, मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांची 'Ease of Doing Business' ही संकल्पना महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सत्यात उतरवली आहे. ग्राहक दैनंदिन जिवनात जे माध्यम वापरतात त्याच 'व्हॉट्सॲपवर' आता महावितरणच्या सेवा अधिकृतपणे पोहोचल्या आहेत. अगदी वीजबिल पाहण्यापासून वीजबिल भरण्यापर्यंत सर्व काही एकाच ठिकाणी ग्राहकाला उपलब्ध झाले आहे. वीजग्राहकांनी या सेवांचा लाभ घ्यावा असे आवाहन महावितरणने केले आहे. राज्यात महावितरणचे ३ कोटी १२ लाखांहून अधिक वीजग्राहक आहेत. तर पुणे परिमंडलात ग्राहकांची संख्या ३९ लाखांच्या घरात आहे. या सर्व ग्राहकांना १३ मार्चपासून महावितरणच्या व्हॉट्सॲप सेवेचा लाभ मिळत आहे. पूर्वी दरमहा येणारे वीजबिल व ते भरल्याची पावती घराघरांत फाईलिंग करुन जतन केले जात असे.

## वेळेत निदान, योग्य उपचार आणि प्रतिबंध हीच टीबीवर मात करण्याची गुरुकिल्ली

*डॉ. आनंद यन्नावार : जागतिक क्षयरोग दिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे जनजागृतीचे आवाहन*

**पुणे (दै. संध्या) :**




जागतिक क्षयरोग दिनाच्या निमित्ताने मेडिकव्हर हॉस्पिटल्स, पुणे यांनी क्षयरोग (टीबी) या गंभीर संसर्गजन्य आजाराबाबत जनजागृती वाढवण्याचे आणि वेळेवर उपचार घेण्याचे आवाहन केले आहे. "वेळेत निदान, योग्य उपचार आणि प्रतिबंध हीच टीबीवर मात करण्याची त्रिसूत्री आहे," असे प्रतिपादन फुफ्फुसरोग तज्ज्ञ डॉ. आनंद यन्नावार यांनी केले. टीबी हा प्रामुख्याने फुफ्फुसांवर परिणाम करणारा आजार असून तो संक्रमित व्यक्ती खोकताना किंवा शिंकताना हवेद्वारे पसरतो. हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो, तरीही उशिरा निदान आणि अपूर्ण उपचारांमुळे त्याचा प्रसार वाढत असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले. भारतात टीबीचा मोठा भार असल्यामुळे जनजागृती आणि वेळेवर वैद्यकीय उपचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. डॉ. यन्नावार यांनी सांगितले की, दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ खोकला, छातीत दुखणे, ताप, वजन कमी होणे आणि थकवा ही लक्षणे दुर्लक्षित करू नयेत.

"लवकर तपासणी आणि अचूक निदान केल्यास टीबीवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते आणि गुंतागुंत टाळता येते," असे त्यांनी नमूद केले. तसेच, औषधांचा पूर्ण कोर्स घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. अपूर्ण किंवा अनियमित उपचारांमुळे ड्रग-रेझिस्टंट टीबी निर्माण होऊ शकतो, ज्यावर उपचार करणे अधिक कठीण ठरते. चांगली स्वच्छता, संतुलित आहार आणि नियमित आरोग्य तपासण्या यामुळे टीबीचा धोका कमी करता येतो. मेडिकव्हर हॉस्पिटल्स, पुणे येथे अत्याधुनिक निदान सुविधा आणि अनुभवी तज्ज्ञांची टीम उपलब्ध असून रुग्णांना वेळेवर आणि प्रभावी उपचार दिले जातात.

जागतिक क्षयरोग दिनानिमित्त रुग्णालयाचा स्पष्ट संदेश आहे की, जनजागृती, जबाबदारी आणि योग्य उपचारांच्या मदतीने टीबीमुक्त समाज निर्माण करणे शक्य आहे.

# हृदयामधील दुर्मिळ जन्मजात रक्तवाहिनीच्या विकारावर यशस्वी उपचार

**पुणे (दै. संध्या) :**



अवघ्या दीड वर्षाच्या एका मुलीच्या हृदयामधील दुर्मिळ जन्मजात रक्तवाहिनी संबंधीच्या विकारावर विश्वराज हॉस्पिटल, लोणी येथील डॉक्टरांच्या पथकाने ट्रान्सकॅथेटर डिव्हाईस क्लोजर ही प्रक्रिया यशस्वीरित्या केली. बाल हृदयविकार तज्ज्ञ डॉ. आशिष बनपूरकर यांच्या नेतृत्वाखाली ही कमीत कमी छेद असलेली हृदयविकार प्रक्रिया करण्यात आली.

याबाबत अधिक माहिती देताना डॉ. आशिष बनपूरकर म्हणाले की, या मुलीच्या रक्तातील अमोनियाचे प्रमाण थोडे वाढल्यामुळे तिला रुग्णालयात दाखल करावे लागले व निरीक्षणाखाली ठेवले होते. हे प्रमाण सुरुवातीला औषधोपचारांनी नियंत्रित करण्यात आले. चालू तपासण्यांमध्ये या मुलीला ॲबर्नथी मालफॉर्मेशन ही दुर्मिळ स्थिती असल्याचे निदान केले. याला कॉंजीनेंटल पोर्टोसिस्टिमिक शंट असे देखील म्हंटले जाते.एका सामान्य लहान मुलामध्ये पोटातील व आतड्यांमधील रक्त हे यकृताकडे पोर्टल व्हेन्सच्या मार्गातून जाते. हृदयात जाण्यापूर्वी येथे त्याचे शुद्धीकरण होते. मात्र याबाबतीत यकृताकडे न जाता पोर्टल व्हेन्स या असामान्यरित्या थेट वेना कावा या शरीरातील मोठ्या रक्तवाहिनीच्या मार्गातून थेट हृदयाशी जोडल्या गेल्या होत्या. या स्थितीमुळे यकृतातील रक्तप्रवाह नीट विकसित झाला नव्हता आणि फुफ्फुसात उच्च रक्तदाब, असामान्य रक्ताभिसरण विकसित होण्याचा धोका होता. त्यामुळे ही असामान्य स्थिती दुरूस्त करणे आवश्यक होते. "ही स्थिती अत्यंत दुर्मिळ असून, सुमारे प्रत्येक पन्नास हजार जन्मांपैकी एका मुलामध्ये आढळतो," असे डॉ. बनपूरकर यांनी सांगितले. "वेळीच उपचार न केल्यास यामुळे यकृत, फुफ्फुसे आणि शरीराच्या चयापचय प्रक्रियेवर गंभीर परिणाम होऊ शकतात." असेही ते म्हणाले. मुलीची शारीरिक स्थिती, रक्त तपासण्या आणि यकृताच्या कार्याचे बारकाईने परीक्षण केल्यानंतर डॉक्टरांनी कॅथेटरच्या मदतीने दोष दूर करण्याचा (ट्रान्सकॅथेटर डिव्हाईस क्लोजर) ही कमीत कमी छेद असलेली प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. या प्रक्रियेदरम्यान डॉक्टरांनी रक्तवाहिनीतून कॅथेटर घालून शिरांमधील रक्ताचा दाब तसेच रक्तप्रवाहाच्या गतीचे अँजिओग्राफी द्वारे मोजमाप केले.

विशेष ऑक्लूजन डिव्हाइस बसवून रक्त जाण्याचा चुकीचा मार्ग बंद करण्यात आला. प्रक्रियेनंतरच्या इमेजिंग आणि सोनोग्राफीमध्ये उपकरण योग्य ठिकाणी बसवल्याचे आणि यकृताकडे रक्तप्रवाह पुन्हा सुरू झाल्याचे दिसून आले.

प्रक्रियेनंतर मुलीने चांगला प्रतिसाद दिला आणि तिला तीन दिवसांत रुग्णालयातून सुटी देण्यात आली. "आता रक्तप्रवाह सामान्य राहील अशी अपेक्षा आहे आणि ही प्रक्रिया कायमस्वरूपी उपाय मानली जाऊ शकेल, तसेच ही समस्या पुन्हा उद्भवण्याची शक्यता अत्यंत कमी आहे," असे डॉ. बनपूरकर यांनी सांगितले.

प्रक्रियेपूर्वी मुलीच्या यकृतातील सीरम अमोनियाची पातळी वाढली होती व अधूनमधून नाकातून रक्तस्राव होत होता. आता असामान्य जोडणी बंद झाल्यामुळे ही लक्षणे हळूहळू कमी होतील. डॉ. बनपूरकर यांनी जन्मजात विकारांमध्ये लवकर निदान आणि नियमित पाठपुराव्याचे महत्त्व अधोरेखित केले. "ही मुलगी गर्भावस्थेपासून निरीक्षणाखाली असल्यामुळे आम्हाला योग्य वेळी उपचार करता आले आणि सुरक्षितपणे ही प्रक्रिया करता आली." या उपचारामध्ये हृदय भूलतज्ज्ञ डॉ. विठ्ठल शेंडगे, रेडिओलॉजिस्ट डॉ. सत्यजित फुंडे आणि कन्सल्टंट इंटेन्सिविस्ट व पेडियाट्रिशियन डॉ. चंद्रकांत सहारे यांचा समावेश होता.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### इच्छाशक्ती आणि आत्मविश्वासाद्वारे महिला कर्तुत्व सिद्ध करु शकतात - उज्वला हावरे




■ 'पीसीयू वूमन लीडरशिप कॉन्क्लेव्ह' मध्ये उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ महिलांची उपस्थिती

पुणे (दैनिक संध्या) : प्रबळ इच्छाशक्ती आणि आत्मविश्वासाद्वारे महिला देखील उद्योग व्यवसायात कर्तृत्व सिद्ध करू शकतात असे प्रतिपादन हावरे इंजिनिअर्स अँड बिल्डर्स प्रा. लि. च्या व्यवस्थापकीय संचालिका उज्वला हावरे यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) येथे इंडस्ट्री इन्स्टिट्यूट इंटरॅक्शन सेलच्या (आयआयआयसी) वतीने आयोजित केलेल्या "पीसीयू वूमन लीडरशिप कॉन्क्लेव्ह २०२६" मध्ये हावरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पीसीइटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्यामध्ये विद्यापीठांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. उद्योग क्षेत्रातील यशस्वी व्यक्तींशी संवाद साधण्याची संधी मिळाल्यास विद्यार्थ्यांना व्यावहारिक दृष्टिकोन प्राप्त होतो आणि ते आपल्या करिअर मध्ये यशस्वी होऊ शकतात. पीसीयू हे एक बहुविषयक विद्यापीठ असून शैक्षणिक उत्कृष्टता, उद्योगाभिमुख शिक्षण, संशोधन आणि नवोपक्रम यासाठी वचनबद्ध आहे. नेतृत्व कॉन्क्लेव्ह, उद्योग संवाद आणि जागतिक सहकार्य यांसारख्या उपक्रमांद्वारे विद्यापीठ विद्यार्थ्यांना भविष्यातील व्यावसायिक आव्हानांसाठी सक्षम बनवत आहे. यावेळी कुलगुरू डॉ. संतोष सोनावणे, पीसीयू व्यवस्थापन समिती सदस्य सचिन इटकर, प्र-उपकुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, रजिस्ट्रार डॉ. अनिल महेश्वरी आणि डॉ. पुरबी गराई (शास्त्रज्ञ, डीआरडीओ), डॉ. मीताली मोरे (एमएसएमई मेंटर), डॉ. तृप्ती रामाने (संचालक, महाराष्ट्र स्टेट बिझनेस असोसिएशन), अॅड. प्रीती परदेशी (उपाध्यक्ष, पुणे बार असोसिएशन), तन्वी औरडकर (संस्थापक, कार्पेडियम), अनुराधा ठाकूर (एचआर बिझनेस पार्टनर, वेसुवियस ग्रुप), रती चौंडावर (हेड एचआर, पोसिव्ह्यू टेक्नॉलॉजीज), डॉ. जहानआरा पठाण शेरडी (सिनियर मॅनेजर, रिक्रूटमेंट अँड आउटप्लेसमेंट, क्वेस कॉर्प), ज्योती यादव (टॅलेंट अॅक्विझिशन मॅनेजर, कॅव्हिस्टा) आणि वैशाली दराडे (सिनियर एचआर, मॅग्ना इंटरनॅशनल) आदी उपस्थित होते. कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले की, प्रगत आणि सर्वसमावेशक समाज निर्माण करण्यासाठी महिला नेतृत्वाला प्रोत्साहन देणे अत्यंत आवश्यक आहे. या कॉन्क्लेव्हमध्ये उद्योग क्षेत्रातील महिला प्रतिनिधी, तज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ यांनी विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सचिन इटकर यांनी आर्थिक आणि उद्योग क्षेत्रात महिलांची वाढती भूमिका महत्वपूर्ण आहे असे मत व्यक्त केले. ही परिषद पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, व्यवस्थापन समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली होती. डॉ. प्रणव चरखा (संचालक, इंडस्ट्री इन्स्टिट्यूट इंटरॅक्शन सेल) आणि डॉ. अर्चना राठोड (संचालक, विद्यार्थी विकास विभाग) यांनी संयोजन केले, तर अक्षता राजगुरू यांनी सूत्रसंचालन केले.

### महायुतीत 'मिठाचा खडा'! साताऱ्याच्या राड्याने सत्ताधाऱ्यांत फूट?

सातारा (दैनिक संध्या) : सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडणुकीदरम्यान मोठा गोंधळ उडाला आहे. या प्रकरणामुळे राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत तणाव निर्माण झाल्याची चर्चा रंगली आहे. विधानसभा आणि विधानपरिषदेतही या घटनेवरून जोरदार वादंग पाहायला मिळाला. यामुळे आता महायुतीत 'मिठाचा खडा' पडल्याची चर्चा रंगली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निवडणूक प्रक्रियेदरम्यान पोलिसांनी काही मंत्री आणि सदस्यांना अडवले. तसेच धक्काबुक्की केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले. शंभूराज देसाई यांनी विधानसभेत सांगितले की, त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना पोलिसांनी आरोपींसारखे फरफटत नेले, मारहाणही केली. मी डायबिटीसचा रुग्ण असूनही मला झटापटीत दुखापत झाली. आम्हाला मतदानापासून रोखण्याचा प्रयत्न झाला. मी पक्षाचा प्रतोद, उपनेता आहे, जिल्हा परिषद सदस्यांना व्हीप बजावण्याचा अधिकार पक्षानं मला दिलेला होता. ते म्हणाले की, माझे आजोबा या राज्याचे माजी गृहमंत्री होते. ज्या आसनावर आपण बसलाय तिथे माझे आजोबा होते. आम्ही तर चौघे होतो पण तिथे एका विशिष्ट पक्षाचे १०-१५ पदाधिकारी होते.

जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र. निविदा/०४१७/
प्र.क्र.२४७/मो.प्र.-१ दिनांक १८/१०/२०२३

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता,**

पत्ताः- धोम बलकवडी प्रकल्प विभाग, वाई ता. वाई, जि. सातारा यांचे कार्यालय

ई-मेल - eedbpdwai@gmail.com दूरध्वनी :- ०२१६७-२९५१०५

**ई-निविदा सूचना क्र. २५ सन २०२५-२०२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, धोम बलकवडी प्रकल्प विभाग, वाई ता. वाई जि. सातारा जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ http:\\mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, धोम बलकवडी प्रकल्प विभाग, वाई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास http:\\mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | धोम बलकवडी उजवा कालवा कि.मी. ६ (रावडी) येथील संरक्षक भिंतीचे काम करणे, धोम बलकवडी उजवा कालवा कि.मी. १७ मधील पोळवाडी बोगद्याच्या निम्न बाजूस व धोम बलकवडी उजवा कालवा कि.मी. २० मधील मिरजेवाडी बोगद्याच्या उर्ध्व बाजूस संरक्षक भिंतीचे काम करणे |
| जिल्हा | पुणे |
| निविदेची किंमत रुपये | ६९.४७ लक्ष |
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक ३०/०३/२०२६ ते दिनांक ०६/०४/२०२६ |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक ०७/०४/२०२६ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे |

जावक क्रं. धोबप्रवि/निविदा/८१०/२०२६.
बलकवडी प्रकल्प विभाग वाई, जि. सातारा
दिनांक:-१८/०३/२०२६.

धोम
सही/-
कार्यकारी अभियंता
धोम बलकवडी प्रकल्प विभाग, वाई,
जि. सातारा

**विमाका/पुणे/जाहि./३८३/२०२५-२६**

# उन्हाळ्यात त्वचेची खास काळजी; एण्ड टीव्हीच्या अभिनेत्रींचे स्किनकेअर टिप्स

**सीरत कपूर आणि विदिशा श्रीवास्तव यांचे नैसर्गिक उपायांवर भर**

मुंबई (दै. संध्या) :



वाढत्या उष्णतेमुळे त्वचेवर होणाऱ्या परिणामांपासून संरक्षण करण्यासाठी योग्य स्किनकेअर रूटीन आवश्यक असल्याचे एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री सीरत कपूर आणि विदिशा श्रीवास्तव यांनी सांगितले आहे. उन्हाळ्यात त्वचेची नैसर्गिक चमक टिकवण्यासाठी साधे, पण प्रभावी उपाय महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

'घरवाली पेडवाली' मालिकेत सावीची भूमिका साकारणाऱ्या सीरत कपूर म्हणाल्या की, त्या उन्हाळ्यात सौम्य जेल-बेस्ड क्लीन्सरचा वापर करून त्वचा स्वच्छ ठेवतात. "सनस्क्रीन हा माझ्या रूटीनचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. हलका, न चिकटणारा SPF वापरणे आणि दिवसातून वेळोवेळी तो पुन्हा लावणे आवश्यक असते," असे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर हायड्रेटिंग फेशियल मिस्ट आणि कोरफडीचे मॉइश्चरायझर त्वचेला ताजेपणा देतात, असेही त्या म्हणाल्या. शरीराला आतून हायड्रेट ठेवण्यासाठी नारळ पाणी आणि फळांचे सेवन करण्यावर त्यांनी भर दिला.

सीरत यांनी केसांच्या निगेबाबतही सांगितले की, खोबरेल आणि बदाम तेलाने मसाज, सल्फेट-मुक्त शॅम्पूचा वापर आणि दही-मधाचा हेअर मास्क यामुळे केस निरोगी राहतात. उन्हाळ्यात हीट स्टायलिंग टाळून केस नैसर्गिकरित्या सुकवणे अधिक फायदेशीर ठरते, असे त्यांनी नमूद केले.

'भाबीजी घर पर है २.०' मालिकेतील अनिता भाबीची भूमिका साकारणाऱ्या विदिशा श्रीवास्तव यांनी सांगितले की, "उन्हाळ्यात त्वचेचे रूटीन साधे ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मी दिवसातून दोनदा चेहरा स्वच्छ करते आणि काकडी किंवा ग्रीन टीसारख्या नैसर्गिक घटक असलेली उत्पादने वापरते." त्यांनी हलक्या, पाण्यावर आधारित मॉइश्चरायझरचा वापर करण्याचा सल्ला दिला.

विदिशा यांनी घरगुती उपायांवर विशेष भर देत चंदन आणि गुलाब पाण्याचा फेस पॅक तसेच थंड गुलाब पाणी टोनर म्हणून वापरण्याची टिप दिली. "हायड्रेशन आणि कमी मेकअप हे उन्हाळ्यात त्वचा निरोगी ठेवण्याचे रहस्य आहे," असे त्यांनी सांगितले. केसांच्या निगेसाठी त्या खोबरेल तेल, सल्फेट-मुक्त शॅम्पू आणि दही-कोरफडीचा हेअर मास्क वापरतात.

दरम्यान, या अभिनेत्रींच्या टिप्समुळे उन्हाळ्यात त्वचेची आणि केसांची योग्य काळजी घेण्यासाठी प्रेक्षकांना उपयुक्त मार्गदर्शन मिळत आहे.

मनोरंजनाची धमाल पाहण्यासाठी 'घरवाली पेडवाली' रात्री १० वाजता आणि 'भाबीजी घर पर है २.०' रात्री १०.३० वाजता एण्ड टीव्हीवर पाहायला विसरू नका.

## श्री स्वामी समर्थ पालखीचे बुधवारी पुण्यात आगमन (दि.२५ मार्च)

पुणे (दै. संध्या) :

■ श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट पालखी पादुका दर्शन

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट येथून श्री स्वामी समर्थ पालखीचे पुण्यात आगमन होत असून बुधवार दिनांक २५ मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता मंडईमधील श्री शारदा गजानन मंदिरापासून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. पालखी पादुका दर्शन सोहळ्यानिमित्त २९ मार्च पर्यंत महानगरपालिकेजवळील कॉंग्रेस भवन येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे आयोजन अण्णा थोरात, विनायक घाटे, नामदेवराव मोहिते, राजाभाऊ वरखडे, विलास चव्हाण यांनी केले आहे. महापौर मंजुषा नागपुरे आणि आमदार हेमंत रासने यांच्या हस्ते पालखी पादुका पूजन आणि आरती होऊन मिरवणूकीस प्रारंभ होईल. यावेळी नगरसेवक राघवेंद्र बाप्पू मानकर, कुणाल टिळक, स्वरदा बापट स्वप्नाली पंडित यावेळी उपस्थित राहणार आहेत. पालखी सोहळ्याचे यंदा २९ वे वर्ष आहे. यंदाचा श्री स्वामी समर्थ पुरस्कार ज्ञानेश्वर माऊली टाकळकर यांना तर स्वामी समर्थ सेवा पुरस्कार दीपक आप्पा वायकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. शनिवार दि. २८ मार्च रोजी संध्याकाळी ६.४५ वाजता हा पुरस्कार वितरण समारंभ होणार आहे. यावेळी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट अक्कलकोटचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले, मोहन बुवा रामदासी, पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले उपस्थित राहणार आहेत. पालखी सोहळ्यात गुरुवार, दिनांक २६ मार्च रोजी रात्री ८ वाजता हर्षद कुलकर्णी हे 'स्वामी भक्ती गीते' सादर करणार आहेत.

## मुंबईतील सफाई कामगारांना मिळणार हक्कांची घरे

मुंबई (दै. संध्या) :

■ उपाध्यक्षांच्या पुढाकारानंतर मुख्यमंत्र्यांचे ठोस आश्वासन..

■ 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना' अधिवेशनात जाहीर होणार



मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांसाठी मोठा दिलासा देणारी घडामोड घडली असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना अंतर्गत त्यांना हक्काची घरे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या पुढाकाराने म्युन्सिपल मजदूर युनियनच्या शिष्टमंडळाने आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान शिष्टमंडळाने शासन निर्णय २००८ व २०१५ ची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेत, मुंबई महापालिकेने नव्याने उभारलेल्या घरांपैकी ५० टक्के घरे सफाई कामगारांना मालकी हक्काने देण्याचे ठोस आश्वासन दिले. तसेच या योजनेची अंमलबजावणी येत्या अधिवेशनात जाहीर करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या मागणीसाठी म्युन्सिपल मजदूर युनियन, मुंबईच्या वतीने २३ मार्च रोजी आझाद मैदान येथे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. मात्र आंदोलनापूर्वीच उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी मध्यस्थी करत मुख्यमंत्री यांची भेट घडवून आणली आणि तोडगा काढण्यात यश मिळवले.

मुंबई महापालिका क्षेत्रातील एकूण ३६ वसाहतींचे पुनर्वसन करण्यात आले असून सुमारे १२,२०० नवीन घरे उभारण्यात आली आहेत. यापैकी ५० टक्के घरे सफाई कामगारांना देण्याचा निर्णय घेतल्याने हजारो कुटुंबांना स्थिर निवासाची संधी उपलब्ध होणार आहे.

या बैठकीस विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, म्युन्सिपल मजदूर युनियनचे अध्यक्ष अशोक जाधव, वामन कविस्कर, हिंदुराव जाधव आदी उपस्थित होते.

## अनिश्चिततेच्या काळात गुंतवणूक : हा एक शहाणपणाचा निर्णय का असू शकतो?

मुंबई (दै. संध्या) :

25 years of trust | TATA AIA LIFE INSURANCE

युद्ध असो किंवा इतर कोणताही तणाव, अशा परिस्थितीत शेअर बाजारात चढ-उतार होणे, त्यामुळे गुंतवणूकदारांनी घाबरून जाणे किंवा सावध होणे स्वाभाविक आहे. परंतु, जर आपण भूतकाळातील घडामोडी पाहिल्या, तर शेअर बाजार आपल्याला काहीतरी वेगळेच शिकवतो. कठीण काळात कंपन्यांचे व्हॅल्युएशन खूप खाली येते आणि लोक भीतीपोटी खरेदी करणे बंद करतात. इतिहास साक्षी आहे की, अशाच काळात गुंतवणूक करणाऱ्यांना भविष्यात सर्वाधिक फायदा झाला आहे. गेल्या अनेक वर्षांतील चढ-उतारांनंतरही भारतीय बाजारपेठेने एक गोष्ट स्पष्टपणे दाखवून दिली आहे: भीतीपोटी पळून जाण्यापेक्षा, योग्य गुंतवणूक धोरण आणि संयम राखून टिकून राहणे हाच खरा विजय आहे. टाटा एआयए लाईफ इन्शुरन्सच्या इक्विटी-लिंक्ड फंड्सनी ५ वर्षांच्या कालावधीत त्यांच्या बेंचमार्कच्या (S&P BSE 200) तुलनेत सातत्याने चांगली कामगिरी केली आहे. यावरून हे स्पष्ट होते की, ते अत्यंत विचारपूर्वक आणि शिस्तबद्ध पद्धतीने गुंतवणूक करतात. त्यांचे गुंतवणूक धोरण गुणवत्ता, स्थिरता आणि दीर्घकालीन कमाईच्या क्षमतेवर आधारित आहे. डेटा २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंतचा. मागील कामगिरी भविष्यातील परताव्याची शाश्वती देत नाही. तिन्ही फंडांसाठी बेंचमार्क: S&P BSE 200. फंड सुरू झाल्याच्या तारखा: टॉप २०० फंड: १२ जानेवारी २००९; मल्टी कॅप फंड: ०५ ऑक्टोबर २०१५; इंडिया कन्झम्प्शन फंड: ०५ ऑक्टोबर २०१५. भारतीय शेअर बाजाराने प्रत्येक संकटाचा धैर्याने सामना केला आहे, हे आकडेवारीवरून स्पष्ट होते. कारगिल युद्ध, मुंबई २६/११, उरी आणि पुलवामा यांसारख्या देशांतर्गत धक्क्यांनंतरही, 'निफ्टी ५० ने एका वर्षात ३६% पर्यंत आणि पाच वर्षांत १००% पेक्षा जास्त परतावा दिला आहे. जागतिक संकटांची कथाही अशीच आहे — इराक युद्धानंतर, बाजारपेठेने एका वर्षात ६८% आणि पाच वर्षांत ३४६% परतावा दिला. बाजार सावरण्याची प्रक्रिया नेहमीच लगेच किंवा सरळ रेषेत नव्हती, परंतु ज्यांनी घाबरून पैसे काढले नाहीत आणि दीर्घकाळ टिकून राहिले, त्यांनी नेहमीच मोठा नफा कमावला. बाजारात गुंतवणुकीची 'योग्य वेळ' शोधण्यापेक्षा तिथे 'जास्त वेळ' टिकून राहणे केव्हाही चांगले. इतिहास साक्षी आहे की, ज्यांनी भू-राजकीय आणि आर्थिक संकटातही आपली गुंतवणूक सुरू ठेवली, त्यांनी भीतीपोटी बाहेर पडणाऱ्यांपेक्षा कितीतरी पटीने जास्त नफा कमावला. निफ्टी ५० चा ट्रॅक रेकॉर्ड एका साध्या सत्याची पुष्टी करतो — बाजारातील चढ-उतार तात्पुरते असतात, पण जर तुम्ही शिस्तीने दीर्घकाळ टिकून राहिलात, तर तुमची संपत्ती अनेक पटीने वाढते. गुंतवणूक करण्यासाठी सर्व काही सुरळीत होण्याची वाट पाहण्यापेक्षा, जेव्हा बाजारात भीतीचे वातावरण असते, तेव्हा गुंतवणूक करणे अधिक फायदेशीर ठरते. बाजाराने वारंवार हे दाखवून दिले आहे की, अनिश्चितता ही प्रत्यक्षात एक लपलेली संधी असते. टाटा एआयए लाईफ इन्शुरन्ससोबत तुम्ही पूर्ण आत्मविश्वासाने गुंतवणूक करू शकता, कारण आमचे फंड्स केवळ संकटांतून सावरले नाहीत, तर अधिक मजबूत होऊन बाहेर पडले आहेत. एका शिस्तबद्ध आणि दीर्घकालीन गुंतवणूक धोरणासह तुमचे आर्थिक भविष्य सुरक्षित करण्यासाठी आमच्यासोबत या.

## सप्तसुरातून रसिकांना नादब्रह्माची अद्वितीय अनुभूती

पुणे (दै. संध्या) :

सुरेल आवाज, भावपूर्ण सादरीकरण आणि विविधरंगी गाण्यांच्या सादरीकरणाने गायिका सावनी रवींद्र यांच्या मैफलीने रसिकांना भारावून टाकले. कार्यक्रमाची सुरुवात 'निशंक होईल रे मना, निर्भय होईल रे मना' या तारक मंत्राने होताच वातावरणात भक्तिरस दाटून आला. स्वामी समर्थांचे नामस्मरण आणि श्रोत्यांनी टाळ्यांच्या गजरात कलाकारांना उत्स्फूर्त दाद दिली. सप्तसुरांच्या या सुरेल मैफलीतून सावनी रवींद्र यांनी रसिकांना नादब्रह्माची अद्वितीय अनुभूती दिली.

श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट, पुणेच्या वतीने 'सद्गुरु श्री जंगली महाराज १३६ वा पुण्यतिथी उत्सव' साजरा करण्यात येत आहे. या उत्सवात सावनी रवींद्र यांनी गायन सेवा दिली. उत्सवाची निमित्ताने मंदिराला आकर्षक विद्युतरोषणाई करण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला 'मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश' या भक्तीगीताने गोव्याच्या मंगेशी मंदिरातील दिव्यता जणू जिवंत झाली. त्यानंतर 'केव्हा तरी पहाटे उलटून रात्र झाली' आणि 'मलमली तारुण्य माझे' या गीतांनी भावविश्वात घेऊन जाण्याचा सुरेख प्रवास घडवला. कार्यक्रमात 'ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू दे', 'बाई बाई मनमोराचा कसा पिसारा फुलला', 'नाही कळले कधी जीव वेडावला', 'तुला जपणार आहे' आणि 'वीण दोघातली ही तुटेना' या गाण्यांनी रसिकांची मने जिंकली. प्रत्येक गाण्यानंतर श्रोत्यांनी उत्स्फूर्त टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

# भारतीय घरातील स्मार्ट आणि 'ऑल-इन-वन' स्वयंपाकाच्या एका नव्या युगाची सुरुवात

मुंबई (दै. संध्या) :




फिलिप्स होम अप्लायन्सेसने फिलिप्स वनशेफ सादर करण्याची घोषणा आज केली. स्वयंपाकासाठी हे एक नावीन्यपूर्ण, सर्वसमावेशक स्मार्ट उपकरण असून, रोजचा स्वयंपाक सोपा करण्यासोबतच भारतीय घरांसाठी पाककलेचे नवनवीन पर्याय करून पाहण्यासाठी ते तयार करण्यात आले आहे.

रणवीर ब्रार यांनी मुंबईतआयोजित केलेल्या 'शेफ्स टेस्टिंग टेबल' या कार्यक्रमात याचे उद्घाटन झाले. पदार्थांची चव पाहून, इंटरॅक्टिव्ह फूड स्टेशन्सच्या माध्यमातून भारतातील विविध खाद्यसंस्कृतींचा आस्वाद घेण्यासाठी पाहुण्यांना या कार्यक्रमात आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान, ब्रार यांनी वर्सुनी इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. गुलबहार तौरानी यांच्यासोबत भारतीय पदार्थांच्या चवीशी कुठेही तडजोड न करता स्वयंपाकघरातील आधुनिक तंत्रज्ञान क्लिष्ट पाककृती कशा सहज- करू शकते, हे दाखवून दिले.

हे लॉन्च म्हणजे आधुनिक भारतीय स्वयंपाकघराची पुनर्कल्पना करण्याच्या दिशेने फिलिप्सने टाकलेले नवीन पाऊल आहे. 'वनशेफ'मध्ये 33 स्मार्ट कुकिंग फंक्शन्स एकाच उपकरणात कार्यरत आहेत. प्रगत 'अँबीहीट' तंत्रज्ञान वापरण्यात आलेले हे उपकरण, योग्य तापमान आणि एकसमान उष्णतेचा वापर करून विविध पदार्थ तसेच स्वयंपाकाच्या टप्प्यांनुसार स्वतःला जुळवून घेते. यामुळे रोजच्या साध्या जेवणापासून ते सणासुदीच्या खास पदार्थांपर्यंत, विविध प्रकारच्या पाककृतींमध्ये एकसारखी चव आणि उत्तम स्वाद मिळतो.

लॉँचप्रसंगी गुलबहार तौरानी म्हणाले, "भारतीय घरांमध्ये प्रत्यक्षात स्वयंपाक कसा केला जातो हे समजून घेणे आणि त्यांच्या रोजच्या सवयीच्या गोष्टींमध्ये सहज सामावले जाणारे उपकरण डिझाइन करणे, यावर आमचे नेहमीच लक्ष राहिले आहे. भारतीय स्वयंपाक अत्यंत वैविध्यपूर्ण आणि अनेकदा वेळखाऊ असतो. म्हणूनच चवीशी तडजोड न करता प्रक्रिया सुलभ करणारे उपाय अधिकाधिक महत्त्वाचे ठरतात. वनशेफच्या माध्यमातून, आम्ही स्वयंपाकाची अनेक तंत्रे एकाच इंटेलिजेंट प्लॅटफॉर्मवर आणू इच्छितो, जो रोजच्या स्वयंपाकाला अधिक सहज आणि चविष्ट बनवतो. व्यावहारिक आणि उद्देशपूर्ण अशा दोन्ही नावीन्यपूर्णतेद्वारे आधुनिक भारतीय स्वयंपाकघराची पुनर्कल्पना करण्याच्या आमच्या व्यापक वचनबद्धतेचे हे प्रतीक आहे."

"भारतीय पाककला अत्यंत वैविध्यपूर्ण आणि बहुआयामी आहे; आणि चवीशी कोणतीही तडजोड न करता, पाककला अधिक सुलभ बनवण्यात हे तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावू शकते. हेच संतुलन साधण्याच्या उद्देशाने 'वन शेफ'ची रचना करण्यात आली आहे. यामुळे गृहिणी अधिक सहजतेने आणि आत्मविश्वासाने विविध प्रकारच्या पाककृती करण्याचा प्रयत्न करू शकतील," असे शेफ रणवीर ब्रार म्हणाले. वनशेफच्या माध्यमातून, फिलिप्सने एअर फ्रायिंग, स्टर फ्रायिंग, स्टीमिंग आणि बॉइलिंग यांसारखी स्वयंपाकाची अनेक तंत्रे एकाच कॉम्पॅक्ट उपकरणात एकत्र आणत ग्राहकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या दृष्टिकोनामुळे स्वयंपाकघरातील कामाची प्रक्रिया सोपी होते आणि गृहिणी अनेक उपकरणे न हाताळता विविध प्रकारचे पदार्थ तयार करू शकतात. भारतीय घरांचा विचार करून डिझाइन केलेले, वनशेफचे सहज वापरता येणारे कंट्रोल्स आणि गाइडेड कुकिंग प्रोग्राम्स ग्राहकांना शेफ-प्रेरित पाककृती सहजपणे तयार करण्यास मदत करतात.

या कार्यक्रमात 'घरगुती स्वयंपाक आणि स्वयंपाकघरातील नवनिर्मितीचे भविष्य' या विषयावर एका चर्चासत्राचेही आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रणवीर ब्रार, गुलबहार तौराणी, दिग्दर्शिका फराह खान आणि तंत्रज्ञान तज्ज्ञ राजीव मखनी यांचा सहभाग होता. 'स्मार्ट उपकरणां'मुळे आधुनिक कुटुंबांना दैनंदिन स्वयंपाकाचा अनुभव किती वेगळा आणि आनंददायी वाटतो, यावर प्रकाश टाकला.

किंमत आणि उपलब्धता : फिलिप्स वनशेफ हे 19 मार्चपासून क्रोमा, रिलायन्स डिजिटल, विजय सेल्स, ऍमेझॉन आणि फ्लिपकार्ट यांसारखी प्रमुख किरकोळ विक्री दुकाने आणि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर उपलब्ध होईल.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### तुकाराम सावंत यांची शिरोली सोसायटीच्या चेअरमनपदी नियुक्ती

चाकण (दैनिक संध्या) : अडीच कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या खेड तालुक्यातील शिरोली विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी तुकाराम गणपत सावंत पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मावळते चेअरमन मारुती बेंडाले यांनी आपल्या पदाचा नियोजित कालावधी पूर्ण झाल्याने इतरांना या पदावर काम करण्याची संधी मिळावी म्हणून स्वखुशीने राजीनामा दिला होता. त्यामुळे हे पद रिक्त झाले होते. या पदासाठी घेण्यात आलेल्या निवडणुकीत तुकाराम सावंत यांचाच एकमेव अर्ज या पदासाठी आल्याने सावंत यांची शिरोली सोसायटीच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड झाली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी एस.एम. बगाटे यांनी दिली. यावेळी कल्याणशिल देखणे, मंगेश सावंत, बाळासाहेब पवळे, महेंद्र शिनकर, माणिक सावंत, अनिल वाडेकर, जितेंद्र वाडेकर, संदीप दजगुडे, सोसायटीचे संचालक देवराम वाडेकर, शांताराम मलघे, मच्छिंद्र उमाप, भानुदास पवळे, वसंत वाडेकर, शंकर लोखंडे, बाळासाहेब पारघे, नारायण सावंत, मारुती बेंडाले, शोभा वाडेकर, नामदेव शिंदे, चांगुना सावंत व सचिव दत्तात्रय मुळुक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तुकाराम सावंत पाटील यांची शिरोली सोसायटीच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. अडीच कोटी रुपयांची उलाढाल आणि सभासद संख्या ६०० असलेल्या शिरोली सोसायटीचे नवनिर्वाचित चेअरमन तुकाराम सावंत पाटील हे शिरोली येथील आदर्श विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष आहेत.

### चाकण : प्रलंबित मालमत्ता करावरील दंड पूर्णपणे माफ

चाकण (दैनिक संध्या) : चाकण नगरपरिषद हद्दीतील नागरिकांच्या हितासाठी आणि शहराच्या विकासाला गती देण्यासाठी नगरपरिषदेमार्फत थकीत मालमत्ता करावर विशेष सवलत जाहीर करण्यात आली असून प्रलंबित मालमत्ता करावरील दंड पूर्णपणे माफ करण्यात आला आहे. दि. १९ मे, २०२५ पर्यंतच्या शास्तीला एक रक्कमी कर भरल्यास माफी देण्यात येणार आहे, अशी माहिती चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव व नगराध्यक्षा मनीषा गोरे यांनी दिली. अभय योजनेचे मुख्य आकर्षण म्हणजे १०० टक्के शास्ती (दंड) माफ करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे थकीत करावरील दंड आता शून्य होणार असून फक्त मुद्दल भरणे अपेक्षित आहे. अभय योजना ही केवळ मंगळवार (दि. ३१) पर्यंत लागू राहणार आहे. या मुदती नंतर कोणालाही दंड माफीचा लाभ घेता येणार नाही, असे नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट केले आहे. चाकण नगरपरिषद हद्दीतील सुज्ञ नागरिकांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. थकीत मालमत्ता कर त्वरित भरून दंडाच्या रकमेतून सुटका मिळवा आणि शहराच्या सर्वांगीण विकासात आपले योगदान द्या, असे आवाहन डॉ. अंकुश जाधव, नगराध्यक्षा मनिषा गोरे व उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे यांनी केले आहे. समस्त चाकणकर नागरिकांनी चाकण नगरपरिषद कार्यालयातील कर विभागात सकाळी दहा ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत संपर्क साधून आपली कार्यवाही पूर्ण करावी, असे डॉ. अंकुश जाधव यांनी सांगितले.

### रवि लांडगे यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड प्रीमियर लीग 2026 चे उत्साहात उद्घाटन

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड प्रीमियर लीग या स्पर्धेमुळे भोसरी परिसरातील युवकांना आपली क्रीडा कौशल्ये सादर करण्यासाठी एक सक्षम व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. स्थानिक पातळीवर अशा स्पर्धा सातत्याने आयोजित झाल्यास खेळाडूंमध्ये आत्मविश्वास, स्पर्धात्मकता आणि प्रगतीची प्रेरणा निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

# कॉमिक कॉन पुणे २०२५ मध्ये गेमिंगचा अनुभव वाढवला

**ब्रँडचा ईस्पोर्ट्स आणि भारतातील वाढत्या गेमिंग संस्कृतीशी दीर्घकालीन नाते दृढ करण्याचा प्रयत्न**

देशभरात ई-स्पोर्ट्स वाढत असताना आणि कॅज्युअल गेमिंग हा नवीनतम ट्रेंड बनत असताना, रॉयल चॅलेंज पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर भारतातील गेमिंग समुदायाशी घट्टपणे जोडलेले आहे. आघाडीच्या क्रिएटर्ससोबत सहयोग करून आणि नाविन्यपूर्ण प्रतिभेला पाठिंबा देऊन, हा ब्रँड स्पर्धात्मक गेमिंगच्या कक्षा रुंदावण्याचे ध्येय ठेवतो. आणि तो सांस्कृतिक चळवळींमध्ये पुढे ढकलण्याचा प्रयत्न करतो.

पुणे (दै. संध्या) :




रॉयल चॅलेंज पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने आपल्या 'क्रिकेट गेमिंग झोन सह पुणे कॉमिक कॉन 2025' मध्ये प्रचंड उत्साह वाढवला. या कार्यक्रमात ई-स्पोर्ट्स चाहत्यांपासून ते कॉस्प्लेअर्स आणि पॉप कल्चर प्रेमींपर्यंत सर्वजण सहभागी झाले. कॉमिक कॉन 21 ते 22 मार्च दरम्यान मेफिल्ड यश गार्डनमध्ये पार पडला. ब्रँडने या कार्यक्रमाद्वारे ई-स्पोर्ट्स क्षेत्रातील आपली वाढती रुची आणि भारतातील बदलती गेमिंग संस्कृती दाखवली.

रॉयल चॅलेंज पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने आपल्या रोमांचक 'क्रिकेट गेमिंग झोन'ला पुन्हा सादर करून कॉमिक कॉनमध्ये उपस्थितांना क्रिकेटचा अनुभव नवीन पद्धतीने अनुभवण्याची संधी दिली. चाहत्यांनी वर्ल्ड क्रिकेट चॅम्पियनशिप 3 मोबाइलवर, क्रिकेट 24 प्लेस्टेशन 5 वर, आणि पूर्णपणे इमर्सिव्ह व्हीआर क्रिकेट सेटअपसाठी लांब रांगा लावल्या. दोन्ही दिवस खेळांचे मैदान भरलेले राहिले.

उत्साह वाढवण्यासाठी, भारतातील आघाडीचे गेमिंग क्रिएटर्स, ज्यात 'स्काउट' यांचा समावेश होता, भेटी-सत्रे आणि मैत्रीपूर्ण प्रदर्शन मॅचेससाठी उपस्थित झाले. त्यांच्या सहभागामुळे स्पर्धात्मक ऊर्जा वाढली आणि चाहत्यांशी इनफ्लुएन्सर्सचा संबंध अधिक घट्ट झाला, ज्यामुळे देशातील वेगाने वाढत असलेल्या गेमिंग संस्कृतीवर सकारात्मक प्रभाव पडला.

वरुण कुरीच, वाइस प्रेसिडेंट-मार्केटिंग आणि पोर्टफोलिओ हेड, डियाजियो इंडिया, म्हणाले:" कॉमिक कॉनहे क्रिएटिव्हिटी, कम्युनिटी आणि धाडसी अभिव्यक्ती एकत्र आणते, त्यामुळे गेमर्सच्या नवीन पिढीशी जोडले जाण्यासाठी हे एक योग्य ठिकाण आहे. गेमिंग आता फक्त एखादे छंद राहिलेले नाही; हे तर तरुण भारत कसे संवाद साधतो, स्पर्धा करतो आणि आपली ओळख बनवतो, यावर प्रभाव टाकते. कॉमिक कॉन मध्ये रॉयल चॅलेंज पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरसह आमचा सहभाग क्रीडा क्षेत्रातील आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. क्रिकेट डिजिटल प्लॅटफॉर्मवर जशी विकसित होत आहे, हे पाहता आम्हाला नव्या पिढीच्या गेमर्सला पाठिंबा देऊन या सांस्कृतिक बदलाचा भाग व्हायचा आहे."

पुण्यतिल कॉमिक कॉन 2026 मध्ये कॉमिक्स, कॉस्प्ले, संग्रहणीय वस्तू आणि क्रिएटर्सच्या सहभागाचा एक खास संगम पाहायला मिळाला. या महोत्सवादरम्यान 'रॉयल चॅलेंज' या पॅकेज्ड वॉटरच्या परतावामुळे कॉमिक कॉन इंडियासोबतचा ब्रँडचा संबंध अधिक दृढ झाला आणि ई-स्पोर्ट्स व गेमिंग क्षेत्रांमध्ये त्याची उपस्थिती वाढली.

अक्षत राठी, सह-संस्थापक आणि एमडी, नॉडविन गेमिंग, म्हणाले:" कॉमिक कॉन इंडिया पॉप कल्चरच्या प्रत्येक पैलूला एकत्र आणते.

यावर्षी, रॉयल चॅलेंज पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने क्रिकेट गेमिंग झोनच्या माध्यमातून काहीतरी नवीन आणले आणि चाहत्यांना थेट स्पर्धात्मक गेमिंगमध्ये सहभागी होण्याचा थरार अनुभवण्याची संधी दिली. याला मिळालेला प्रतिसाद अप्रतिम होता आणि संपूर्ण आठवडाभर दिसलेल्या उत्साहावरून येथील प्रेक्षकांमध्ये गेमिंग किती लोकप्रिय आहे हे दिसून आले.

## सीआयआय पश्चिम विभाग वार्षिक बैठक २०२६

मुंबई (दै. संध्या) :

कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) पश्चिम विभागाची वार्षिक बैठक २०२६ येत्या २५ मार्च रोजी आयोजित करण्यात येणार असून, यावेळी 'पश्चिमेचा विकास: वाढ, नावीन्य आणि जागतिक स्पर्धात्मकतेला चालना' या विषयावर विशेष शिखर परिषद होणार आहे. या परिषदेत उद्योगपती, धोरणकर्ते, विचारवंत तसेच स्टार्ट-अप क्षेत्रातील प्रतिनिधी

■ वाढ, नावीन्य आणि जागतिक स्पर्धात्मकतेवर भर

सहभागी होणार आहेत. उत्पादन क्षेत्र, नावीन्य, शाश्वत विकास आणि जागतिक स्पर्धात्मकता या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा केली जाणार आहे. पश्चिम भारत देशाच्या औद्योगिक आणि निर्यात वाढीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असून, भारताच्या जागतिक आर्थिक स्थानाला बळकटी देण्यासाठी या चर्चेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## "मतदानापासून वंचित ठेवणे म्हणजे लोकशाहीचा खून"

■ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा साताऱ्यातील घटनेवर घणाघात

■ विधानसभेत शिंदेंनी मांडली वस्तुस्थिती; साताऱ्यात मतदारांना रोखण्याच्या प्रकारावर उपस्थित केले गंभीर प्रश्न

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले कारवाईचा आश्वासन

मुंबई (दै. संध्या) :

राज्य विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनातून बोलताना राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीत झालेल्या गोंधळावर संतप्त प्रतिक्रिया देत स्पष्ट शब्दांत म्हटले की, "मतदानापासून वंचित ठेवणे म्हणजे लोकशाहीचा खून आहे." या घटनेला त्यांनी अत्यंत गंभीर स्वरूपाचे प्रकरण ठरविले. सदरची बाब त्यांनी आज विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडली. विधानसभेत बोलताना शिंदे यांनी सांगितले की, निवडणुकीपूर्वीच शंभूराज देसाई आणि मकरंद पाटील यांनी त्यांना फोन करून दोन मतदारांवर अचानक गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती दिली होती. या प्रकारामागे निवडणुकीचा निकाल बदलण्याचा प्रयत्न असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला. त्यानंतर शिंदे यांनी तत्काळ साताऱ्याचे पोलीस अधीक्षक तुषार जोशी यांच्याशी संपर्क साधून स्पष्ट सूचना दिल्या होत्या की, मतदान पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मतदाराला अडवू नये.

मात्र प्रत्यक्षात दोन मतदारांना ताब्यात घेण्यात आल्याने संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. या घटनेचा निषेध करताना शिंदे म्हणाले की, महाराष्ट्राच्या इतिहासात अशा प्रकारे मतदारांना मतदानापासून रोखण्याची घटना प्रथमच घडली असून हा प्रकार लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांवर आघात करणारा आहे. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानापासून वंचित ठेवणे सहन केले जाणार नाही, असे त्यांनी ठामपणे स्पष्ट केले.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल आणि चौकशीत जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला सांगितले.

# नवगतीने पीडीएपी एजीएम २०२६ मध्ये पेट्रोलियम डीलर्ससाठी 'एव्हेग प्रो' सादर केले

**'एव्हेग प्रो' मुळे विक्रीची नोंद, स्टॉक व्यवस्थापन, फ्लीट क्रेडिट आणि दैनंदिन हिशेब करणे सोपे होणार**

पुणे (दै. संध्या) :




भारतातील अग्रगण्य फ्युएल-टेक स्टार्टअप नवगतीने पेट्रोल पंप डीलर्ससाठी 'एव्हेग प्रो' हे नवीन डिजिटल प्लॅटफॉर्म लॉन्च केले. या डिजिटल प्लॅटफॉर्मचे लाँच पुण्यात झालेल्या पेट्रोल डीलर्स असोसिएशन पुणे (पीडीएपी) 2026 च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत (एजीएम) करण्यात आले. या प्लॅटफॉर्ममुळे पेट्रोल पंप व्यवसाय अधिक डिजिटल आणि आधुनिक होण्यास मदत होणार आहे. हे प्लॅटफॉर्म खास भारतीय फ्युएल रिटेल क्षेत्रासाठी तयार करण्यात आले आहे.

एव्हेग प्रो हे पेट्रोलियम डीलर्सना येणाऱ्या अनेक दैनंदिन अडचणी सोडवण्यासाठी तयार करण्यात आले आहे. यामध्ये विक्रीचे हाताने हिशेब जुळवणे, स्टॉकमधील फरक तपासणे, फ्लीट बिलिंग, रोख आणि इतर पेमेंटमधील फरक, रोजच्या तपासणीच्या नोंदी आणि क्रेडिट जोखीम यांचा समावेश आहे. हे सर्व महत्त्वाचे काम एकाच डिजिटल सिस्टीममध्ये करता येतात. त्यामुळे पेट्रोल पंपाचे संपूर्ण कामकाज सोपे आणि अधिक व्यवस्थित होते.

हे प्लॅटफॉर्म इंधन विक्रेत्यांना विक्री, शिफ्ट व्यवस्थापन आणि एसएल5 नॉझलचे हिशेब (रिकन्सिलिएशन) सहजपणे सांभाळण्यास मदत करते. तसेच, यात लाईव्ह इन्व्हेंटरी ट्रॅकिंग, स्टॉकमधील फरक नियंत्रण, डिजिटल फ्लीट करार, एकत्रित बिलिंग, क्रेडिटवर लक्ष ठेवणे, व्हाउचर व्यवस्थापन आणि रिअल-टाइम बॅलन्स शीट पाहण्याची सुविधा उपलब्ध आहे. भारतातील पेट्रोलियम रिटेल व्यवसायातील गुंतागुंत लक्षात घेऊन हे प्लॅटफॉर्म तयार करण्यात आले आहे. यात व्हॅट, जीएसटी, सेस आणि सरचार्ज यांचे व्यवस्थापनही करता येते, त्यामुळे डीलर्सना अचूक आणि ऑडिटसाठी तयार आर्थिक नोंदी ठेवणे सोपे जाते. या लाँचबद्दल बोलताना नवगतीचे सह-संस्थापक आणि सीईओ वैभव कौशिक म्हणाले, "एव्हेग प्रो हे इंधन विक्रेत्यांच्या रोजच्या कामातील अडचणी सोडवण्यासाठी उपाय तयार करण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतीक आहे. भारतात अजूनही इंधन विक्री व्यवसायात अकाउंटिंग, स्टॉक तपासणी, ताळमेळ (रिकन्सिलिएशन) आणि ग्राहकांच्या क्रेडिट व्यवस्थापनासाठी वेगवेगळ्या आणि हाताने चालणाऱ्या पद्धती वापरल्या जातात. एव्हेग प्रो द्वारे आम्ही ही सर्व कामे एकाच प्लॅटफॉर्मवर आणत आहोत, ज्यामुळे विक्रेत्यांना अधिक स्पष्टता, नियंत्रण आणि कार्यक्षमतेने काम करता येईल." नवीन प्लॅटफॉर्मबद्दल बोलताना नवगतीचे सह-संस्थापक आलाप नायर म्हणाले, "एव्हेग प्रो हे भारतातील इंधन विक्री व्यवसायाच्या दैनंदिन कामकाजाच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहे. शिफ्टनुसार हिशेब ठेवणे, स्टॉक ट्रॅकिंग, फ्लीटसाठी एकत्रित बिलिंग आणि लाईव्ह आर्थिक अहवाल या सर्व गोष्टी सोप्या करण्यासाठी हे प्लॅटफॉर्म तयार आहे. यामुळे कामातील गुंतागुंत कमी होईल आणि निर्णय घेणे अधिक सोपे होईल. आमचा उद्देश डीलर्सनी हाताने चालणाऱ्या (मॅन्युअल) पद्धती सोडून अधिक स्मार्ट आणि वाढत्या व्यवसायासाठी योग्य अशा पद्धती वापराव्यात हा आहे."

# खेळाला ताकद अन् देशाचे सक्षमीकरण

*उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडची मुंबई इंडियन्ससोबत टी20 लीग 2026 साठी अधिकृत बँकिंग पार्टनर म्हणून भागीदारी*

मुंबई (दै. संध्या) :

■ उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँकने टी20 लीग 2026 साठी मुंबई इंडियन्ससोबत अधिकृत बँकिंग पार्टनर म्हणून भागीदारी केली

■ उत्कर्ष एसएफबीएल आणि मुंबई इंडियन्सचे वरिष्ठ अधिकारी या प्रसंगी उपस्थित होते

■ ही भागीदारी क्रिकेट चाहत्यांमध्ये बँकेची राष्ट्रीय पातळीवरील पोहोच मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्वाचा टप्पा आहे




उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (उत्कर्ष एसएफबीएल) ची टी-२० २०२६ च्या लीगसाठी 'मुंबई इंडियन्स' चे अधिकृत बँकिंग भागीदार म्हणून निवड झाली असून बँकेने या महत्वपुर्ण भागीदारीची घोषणा आज केली. बँकेसाठी हा धोरणात्मक भागीदारीचा अतिशय महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या भागीदारीच्या माध्यमातून बँक आपली राष्ट्रीय स्तरावरील ओळख वाढवण्याबरोबरच देशभरातील कोट्यवधी क्रिकेट चाहत्यांशी आपले नाते अधिक दृढ करत आहे.

सदर घोषणेसाठी आयोजित विशेष कार्यक्रमाला उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गोविंद सिंग, मुख्य वित्त अधिकारी श्री. सरजुकुमार प्रवीण सिमारिया आणि कन्झ्युमर बँकिंग प्रमुख श्री. सौरभ घोष तसेच मुंबई इंडियन्स फ्रँचायझीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

श्री गोविंद सिंग, व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड या ऐतिहासिक भागीदारीबद्दल बोलताना म्हणाले, "मुंबई इंडियन्ससारख्या संघासोबत भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे कारण हा एक असा संघ आहे ज्यांनी कामगिरी, नेतृत्व आणि चाहतावर्गाशी संवाद यात सातत्याने नवे मापदंड प्रस्थापित केले आहेत. ही भागीदारी देशभरातील ग्राहकांशी अधिक मजबूत नाते निर्माण करण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे, तसेच, देशातील या अत्यंत लोकप्रिय क्रीडा व्यासपीठामुळे आमच्या ब्रँडची ओळख जनसामान्यात अधिक मजबूत होणार आहे."

मुंबई इंडियन्सच्या प्रवक्त्याने या भागीदारीबद्दल बोलताना सांगितले की, "उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँकचे मुंबई इंडियन्स परिवारात स्वागत करताना आम्हाला आनंद होत आहे. त्यांची मजबूत मूल्ये, ग्राहक-केंद्रित दृष्टिकोन आणि आर्थिक समावेशनाबाबतची बांधिलकी आमच्या विचारसरणीशी सुसंगत आहे. आम्ही प्रभावी भागीदारीची अपेक्षा करतो."

या भागीदारीचा एक भाग म्हणून, उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँकेचे उद्दिष्ट विविध ग्राहक वर्गांशी आपला संवाद आणि सहभाग वाढवणे, तसेच या हंगामादरम्यान राबवल्या जाणाऱ्या एकात्मिक मार्केटिंग उपक्रमांद्वारे व इतर नियोजित कार्यक्रमांद्वारे आपल्या ब्रँडची उपस्थिती अधिक ठळक करणे आहे.

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे**

**संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, स्कॅनर व इतर अनुषंगिक साहित्य भाडेतत्वावर पुरवठा करणे करीता निविदा सुचना**

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
निवडणूक शाखा
पीईई-1A/कावि/232/2026
दि. 23/03/2026

पुणे जिल्ह्यातील होणाऱ्या आगामी लोकसभा/विधानसभा/विधानपरिषद/शिक्षक व पदवीधर सार्वत्रिक निवडणूक 2026 कामकाजाकरीता तसेच सदर निवडणूकांच्या पूर्व तयारीकरीता, जिल्हा निवडणूक कार्यालय पुणे, व जिल्हयातील सर्व विधानसभा मतदार संघ, मुख्यालय अथवा सक्षम प्राधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, स्कॅनर व इतर अनुषांगिक साहित्य भाडेतत्वावर पुरवठा करणेकामी अनुभवी व योग्य अभिकर्त्याकडुन विहीत नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**निविदेच्या कामाचा तपशील :-**

पुणे जिल्ह्यातील होणाऱ्या आगामी लोकसभा/विधानसभा/विधानपरिषद/शिक्षक व पदवीधर सार्वत्रिक निवडणूक 2026 कामकाजाकरीता तसेच सदर निवडणूकांच्या पूर्व तयारीकरीता, जिल्हा निवडणूक कार्यालय पुणे, व जिल्हयातील सर्व विधानसभा मतदार संघ, मुख्यालय अथवा सक्षम प्राधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, स्कॅनर व इतर अनुषंगिक साहित्य भाडेतत्वावर पुरवठा करणेसाठी ई निविदा प्रसिध्द करण्यात येत आहे. आवश्यक वस्तु अंदाजे

| अ. क्र. | वस्तूचे नाव | परिमाण |
|---|---|---|
| १ | संगणक | प्रति विधानसभा मतदार संघ 10 |
| २ | प्रिंटर | प्रति विधानसभा मतदार संघ 10 |
| ३ | लॅपटॉप | प्रति विधानसभा मतदार संघ 10 |
| ४ | स्कॅनर | प्रति विधानसभा मतदार संघ 10 |

**सदर निविदेची कार्यक्रम पत्रीका खालील प्रमाणे राहील.:-**

| | |
|---|---|
| अंदाजित निविदा रक्कम रुपये | 1,00,00,000/- (रु. एक कोटी फक्त) |
| कोऱ्या ई निविदा फॉर्मची किंमत रक्कम रुपये (ऑनलाईन भरणा केलेली पावती जोडावी) | 20,000/- (रु. वीस हजार फक्त) (विना परतावा) |
| बयाणा EMD रक्कम रुपये (ऑनलाईन भरणा केलेली पावती जोडावी) | 3,00,000/- (रु. तीन लाख फक्त) |
| सुरक्षा अनामत रक्कम रुपये (ई-निविदा मंजूर झालेनंतर राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी) | 5,00,000/- (रु. पाच लाख फक्त) |
| ई-निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | 25/3/2026 दुपारी 2.00 वाजता |
| ई-निविदा ऑनलाईन स्वीकृतीचा दिनांक व वेळ | 25/3/2026 ते 6/4/2026 दुपारी 3.00 वाजता |
| निविदा पुर्व बैठक Pre- Tender Conference (PTC) दिनांक व वेळ | 27/3/2026 दुपारी 3.00 वाजता |
| ई-निविदा लिफाफा क्र. १ (निविदा तांत्रिक लिफाफा) उघडण्याचा दिनांक व वेळ | 6/4/2026 दुपारी 1.00 वाजता |
| ई-निविदा लिफाफा क्र. २ (व्यवसायिक/दराबाबतचा लिफाफा) उघडण्याचा दिनांक व वेळ | तांत्रिक निविदा उघडण्यात आल्यानंतर व्यवसायिक दराच्या लिफाफा उघडण्याबाबत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सुचित केली जाईल. |
| ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी पुणे यांचे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे नवीन इमारत, बी. विंग, चौथा मजला, पुणे येथे राहील |
| निविदा करार कालावधी | 2 वर्ष |
| ई-निविदा संपर्क अधिकारी | श्रीमती. शर्मिला गोसावी ना. तह. (दूरध्वनी क्र. 8983535483) |

टिप :-

1. ज्या निविदाधारकांचे निविदा अर्ज http://mahatenders.gov.in या संकेस्थळावर निर्धारीत मुदतीत सादर केली जातील. केवळ त्याच निविदा धारकांच्या निविदा विचारात घेण्यात येतील. सदर निविदेची वैद्यता 120 दिवसांकरीता राहील. तसेच आवश्यकतेनुसार अतिरिक्त 60 दिवसांची मुदतवाढ देण्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी, तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना राहील.
2. प्राप्त झालेल्या निविदा कारणाशिवाय स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी पुणे यांनी स्वतः राखून ठेवले आहे.
3. सदरची निविदा काम प्राप्त करुन देण्याची कोणतीही हमी देत नाही.
4. निविदेत भाग घेणाऱ्या निविदाधारकांनी क्लास III डिजिटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर विहीत नाव नोंदणी करून घेणे आवश्यक आहे.
5. निविदाधारकाने/प्राधिकृत प्रतिनिधीने निविदा पूर्व बैठकीला Pre- Tender Conference (PTC) उपस्थित रहाणे आवश्यक आहे.
निविदेबाबतची पुर्व बैठक वरीलप्रमाणे निर्धारित केलेल्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे निवडणूक शाखा, बी विंग, चौथा मजला, पुणे येथे राहील.
6. निविदाधारकांनी अथवा त्यांनी नामनिर्देशीत केलेल्या प्रतिनिधीने निविदा उघडण्याचे वेळी जिल्हाधिकारी कार्यालय. पुणे येथे उपस्थित रहावे.
7. सदर निविदेच्या अटी व शर्ती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

सही/-
(जितेंद्र डुडी)
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक, अधिकारी, पुणे

क्रमांक : आरओसी-2025-26/क्र-5/C6745

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ग्रामपंचायत पाडळी बारवच्या उपसरपंचपदी अदिती बाळासाहेब सदाकाळ यांची निवड

जुन्नर (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील अग्रेसर असलेल्या पाडवी बारव या ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी अदिती बाळासाहेब सदाकाळ यांची निवड झाली आहे.अदिती सदाकाळ यांची दुसरी टर्म आहे.अन्य ग्रामपंचायत सदस्यांमध्ये संतोष केदारी, संजय परदेशी, जितेंद्र कबाडी, नेमतअली सय्यद, शीतल कळबे, ज्योती पापडे, अश्विनी कबाडी यांचा समावेश आहे.अदिती सदाकाळ या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नुकतीच जुन्नर नगरपरिषदेची नगरसेवक पदाची निवडणूक लढविलेले, शिवभक्त बाळासाहेब सदाकाळ यांच्या पत्नी आहेत.तर जुन्नरच्या काले ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अजितशेठ तरुलता कृष्णकांत पानसरे यांची कन्या आहे.अदिती सदाकाळ यांच्या निवडीमुळे सर्व स्तरातून तिचे अभिनंदन होत आहे. जुन्नरचे आमदार शरद सोनावणे,शिवसेना उबाठा पुणे जिल्ह्याचे संपर्क प्रमुख आमदार सचिन अहिर, जुन्नरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार अतुलशेठ वल्लभशेठ बेनके,भाजप नेत्या आशाताई बुचके आदिंनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### दौंडच्या सराईत गुन्हेगार महेश चोरमले चार जिल्ह्यात तडीपार

दौंड (दैनिक संध्या) : दौंड तालुक्यातील गोपाळवाडी येथील महेश रमेश चोरमले सराईत गुन्हेगार यास पुणे पोलीस अधीक्षक संदीप गिल यांच्या मार्गदर्शनाखाली चार जिल्ह्यांमध्ये तडीपार करण्यात आले आहे सदर भा,ध,वी,कलम 340, 307,167, 354, 222, 657 660 अशा अनेक कलमां मध्ये पुणे, अहिल्यानगर, सोलापूर सातारा, या चार जिल्ह्यातून आरोपीला तडीपार करण्यात आले आहे सदर आरोपीने दौंड तालुक्यामध्ये गुन्हेगारीचे मोठे तांडव उभे केले होते सर्वसामान्य नागरिकांना खुनी हल्ला, महिलांना दमबाजी इतर गुन्हे आरोपीने घडऊन आणले आहे, तसेच यवत पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सराईत गुन्हेगारांची चौकशी सुरू केली आहे काही दिवसांमध्ये ज्या गुन्हेगारांवरती अनेक गुन्हे दाखल असतील त्यांना लवकर चार जिल्ह्यातून तडीपार करणार असल्याचे पुणे पोलीसअधीक्षक संदीप गिल यांनी दैनिक संध्याला माहिती दिली.

### नशेत 112 वर कॉल करणाऱ्यावर गुन्हा दाखल

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील उंब्रज नं. 1 येथील किरण रामदास गायकवाड या आरोपीने 18 मार्च रोजी सायंकाळी 4:30 वाजता 'डायल 112' या आपत्कालीन क्रमांकावर सलग चार वेळा कॉल करून "चार दिवसांपूर्वी मला मारहाण झाली असून शिवीगाळ होत आहे, मदत हवी" आहे असा खोटा संदेश त्यांना दिला होता. या कॉलच्या आधारे पोलीस गायकवाड यांच्या घरी आले असता गायकवाड दारूच्या नशेत आढळून आला. तपासात त्याला कोणतीही मारहाण झाली नसल्याचे स्पष्ट झाले.उलट तो सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्याला प्राथमिक आरोग्य केंद्र ओतूरला नेण्यात आले असता डॉक्टरांनी तो मद्यप्राशन केल्याचे घोषित केले. वारंवार 'डायल 112' वर खोटे कॉल करून पोलीसांची दिशाभूल करत असल्याने ओतूर पोलीस ठाण्यात गायकवाड याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे



### महिला पुरस्काराने भाटे व मोढवे सन्मानित

नारायणगाव (दैनिक संध्या) : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मंगलमूर्ती ग्रुप मंचर यांच्या वतीने जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पुणे जिल्हा महिला उपाध्यक्ष प्रांजल पंकज भाटे आणि मढ येथील उद्योजिका सविता मोढवे यांना 'कर्तृत्ववान महिला पुरस्कार 2026'देऊन सन्मानित करण्यात आले,अशी माहिती मंगलमूर्ती ग्रुपच्या संस्थापिका शिल्पा बनबेरू यांनी दिली. या कार्यक्रमाचे आयोजन शिल्पा लेडीज पार्लर, संयोजन समितीच्या सदस्य अंबिका अलंकार,महालक्ष्मी ज्वेलर्स,सारिका,अनुष्का, निकिता, कावेरी आणि प्रसन्न मेकअप आर्टिस्ट यांनी केले होते. दरवर्षी मंगलमूर्ती ग्रुपच्या संयोजक समितीच्या वतीने महिलांसाठी योगदान करणाऱ्या महिलांना सन्मानित करण्यात येते. तसेच यावेळी महिलांसाठी वेगवेगळ्या खेळांचे आयोजन देखील करण्यात आले होते. कार्यक्रमाचे औचित्य साधून महिलांसाठी असलेल्या विविध कर्ज योजनांची व वैयक्तिक लाभाच्या योजनांची माहिती देण्यात आली.



### शाहिद दिनानिमित्त जेजुरी नगरपरिषदेत क्रांतिकारकांना अभिवादन

जेजुरी (दैनिक संध्या) : भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारक भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना ब्रिटिश सरकारने फाशीची शिक्षा दिली.शहीद दिनानिमित्त या शहीद क्रांतिकारकांना शहीद दिनानिमित्त जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने आदरांजली वाहण्यात आली. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात क्रांतिकारक भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्यावर देशद्रोहाचे खटले भरून ब्रिटिश सरकारने या क्रांतिकारकांना23 मार्च 1931 रोजी फाशीची शिक्षा दिली. हा दिवस शहीद दिन म्हणून ओळखला जातो. या शहीद दिनानिमित्त जेजुरी नगरपरिषदेत नगराध्यक्ष जयदीप बारभाई,उपनगराध्यक्ष गणेश निकुडे मुख्याधिकारी चारुदत्त इंगूले , श्री मार्तंड देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त मंगेश घोणे,यांच्या हस्ते शहीद क्रांतिकारक भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले. यावेळी नगरसेवक कृष्णा कुदळे,योगेश जगताप,माजी नगरसेवक रमेश बयास,राजू पानसरे,नगरसेविका मंदा बयास, अमिणा पानसरे,पालिकेचे अधिकारी बाळासाहेब खोमणे,प्रमोद भापकर,गणेश रणदिवे,अमर शेडगे,बाळासाहेब भोसले,सुनील ताजवे,तुषार गाढवे आदी उपस्थित होते.

# जुन्नर तालुका शिक्षक पतसंस्थेच्या मोबाईल ॲप सुविधेचा शुभारंभ



**नारायणगाव (दै. संध्या)**

स्वातंत्र्यपूर्व काळात 1923 साली स्थापन झालेल्या 102 वर्षांची यशस्वी परंपरा असलेल्या जुन्नर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या "मोबाईल ॲप सुविधेचा" शुभारंभ सहकारी संस्था जुन्नरचे सहाय्यक निबंधक डॉ.गजेंद्र देशमुख,जुन्नर तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अमितशेठ बेनके,महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था सेवानिवृत्त जॉईंट रजिस्ट्रर तानाजी कवडे यांच्या शुभहस्ते संस्थेच्या राजा शिवछत्रपती सभागृह जुन्नर येथे संपन्न झाला.

आजच्या डिजिटल युगात सभासदांना मोबाईल ॲपच्या सुविधेद्वारे स्वतःच्या सर्व प्रकारच्या खात्यांची माहिती व संस्थेची सर्व माहिती ऑनलाईन स्वरूपात पाहण्याची सुविधा उपलब्ध होत आहे अशी माहिती संस्थेचे सभापती सचिन मुळे यांनी दिली.

जुन्नर तालुक्यामध्ये 200 सहकारी संस्था असून शतकोत्तर वाटचाल करत असलेल्या मोजक्या संस्थांपैकी जुन्नर तालुका शिक्षक पतसंस्था असून तालुक्यातील पतसंस्थांना आदर्श ठरेल असे काम ही पतसंस्था करत आहे असे गौरवोद्गार तालुका फेडरेशनचे अध्यक्ष अमितशेठ बेनके यांनी काढले.

जुन्नर तालुका शिक्षक पतसंस्थेचे कामकाज पारदर्शक व आदर्शवत असून संस्थेने महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळविण्यासाठी प्रयत्न करावे असे आव्हान सहकारी संस्था जुन्नरचे सहाय्यक निबंधक डॉ.गजेंद्र देशमुख यांनी केले.

राज्यातील सहकारी संस्थांच्या तुलनेने सेवक पगारदार वर्गातील जुन्नर शिक्षक पतसंस्थेच्या नफ्याचा रेशो सर्वाधिक असून पतसंस्थेचे कामकाज उत्कृष्ट असल्याचे प्रतिपादन राज्य सहकारी संस्था सेवानिवृत्त जॉईंट रजिस्ट्रर तानाजी कवडे यांनी केले. संस्थेच्या 102 वर्षाच्या प्रगतीचा आलेख जिल्हा संघाचे सरचिटणीस खंडेराव ढोबळे यांनी मांडला. यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक संघाचे संपर्कप्रमुख मंगेश मेहेर,जिल्हा सरचिटणीस खंडेराव ढोबळे,तालुका अध्यक्ष रमाकांत कवडे,राज्य प्रतिनिधी विकास मटाले,भरत बोचरे,जिल्हा प्रतिनिधी राम संभेराव,सुनील हाडवळे,संतोष पानसरे,तालुका पदाधिकारी वैभव सदाकाळ,अशोक बांगर,प्रभाकर दिघे,संदिप शिंदे,दिपक मुंढे,महिला आघाडी अध्यक्षा शुभदा गाढवे,स्वप्नजा मोरे,वैशाली कु-हाडे,केंद्रप्रमुख कमलाकांत मुंढे,दिनेश मेहेर,रवींद्र कुटे,संस्थेचे मानद सचिव जितेंद्र मोरे,खजिनदार सुभाष दाते,माजी सभापती विजय लोखंडे,अनिल कुटे,अंबादास वामन,नानाभाऊ कणसे,पुनम तांबे,दिलीप लोहकरे,सुनीता वामन,अविनाश शिंगोटे,दत्तात्रय घोडे,ज्ञानदेव गवारी,सरचिटणीस उमेश शिंदे, सहचिटणीस दत्तात्रय हांडे व सभासद बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी सभापती संतोष पाडेकर यांनी केले तर आभार संस्थेच्या उपसभापती सविता कु-हाडे यांनी मानले.

## शिरूर तालुक्यात स्वस्त धान्य दुकानातून पुन्हा केरोसीन वितरणाची मागणी

**कवठे येमाई (दै. संध्या)**



शिरूर तालुक्यात सध्या घरगुती गॅसचा तुटवडा जाणवू लागल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः कवठे यमाईसारख्या मोठ्या गावातही गॅस उपलब्धतेचा प्रश्न गंभीर होत चालला असून अनेक गृहिणींनी पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्यास सुरुवात केल्याचे चित्र दिसून येत आहे. काही ठिकाणी अडगळीत पडलेल्या जुन्या लाकडे,ऑइल वर शेगड्याही वापरात आणल्या जात असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर शिधापत्रिका धारकांना रास्त भाव दुकानामार्फत पुन्हा केरोसीन (रॉकेल) उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे पुणे जिल्हाध्यक्ष सोमनाथ वचकल यांनी शासनाला आवाहन केले आहे कि,शहरी व ग्रामीण भागातील गॅस टंचाई च्या पार्श्वभूमीवर प्रती कुटुंब किमान ४ लिटर केरोसीन ते ही सवलतीच्या दरात तात्काळ उपलब्ध करून द्यावे. तर शिरूर तालुक्यातील कवठे यमाई येथील गणेश कुंभार, दिनकर इचके, फक्कड वामन सांडभोर, मच्छिंद्र बोराडे, जयसिंग जालिंदर इचके, कैलास फटांगडे, बेबीताई कुळके, प्रतिमा काळे,अमोल ढोरके,प्रकाश पळसकर आदी लाभार्थ्यांनी केरोसीनचा स्वयंपाकासाठी वापर करण्यास तयारी दर्शविली आहे.

## चाकण परिसरात मोकाट कुत्र्यांचा धुमाकूळ

**मेदनकरवाडीत महिलेवर प्राणघातक हल्ला**

**चाकण (दै. संध्या)**

चाकण शहर व परिसरात मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात धुमाकूळ सुरु असून, एक महिला ठार झाल्याची व एकाच दिवसात १३ जणांवर जीवघेणा हल्ला केल्याची घटना ताजी असतानाच चाकण लगतच्या मेदनकरवाडी (ता. खेड) येथे कामावर जाणाऱ्या एका ३६ वर्षीय महिला कामगारावर कुत्र्यांच्या टोळक्याने भीषण हल्ला केला. या हल्ल्यात संबंधित महिला गंभीर जखमी झाली असून, त्यांच्यावर पिंपरी चिंचवड येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात तातडीचे उपचार सुरू आहेत.

कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या महिलेला नागरिकांनी तातडीने अधिक उपचारासाठी चाकण ग्रामीण रुग्णालयात नेले. त्यानंतर अधिक उपचारासाठी वायसीएम मध्ये दाखल करण्यात आले. चाकण मध्ये शोभा वाघमारे या महिलेला श्वानांनी हल्ला करून ठार केल्याची घटना गेल्या आठवड्यात घडली होती. त्यानंतर आठ दिवसांत हा दुसरा गंभीर प्रकार घडला.

चाकण मधील ३२ वर्षीय महिलेला कुत्र्याने ठार केल्याची ही घटना या भागातील पहिलीच घटना नाही. तर यापूर्वी मेदनकरवाडी येथे एक मुलगी अशाच प्रकारे कुत्र्यांच्या हल्ल्यात ठार झाली आहे. चार जानेवारीला चाकण शहरात पिसाळलेल्या कुत्र्यांनी चक्क एकाच वेळी ३३ नागरिकांना चावा घेतला होता.

चाकण परिसरात अनेक ठिकाणी लहान मुलांवर भटक्या कुत्र्यांनी जीवघेणे हल्ले केल्याच्या नोंदी प्रशासनाकडे आहेत. मानवावर हल्ला करून ठार करणारी कुत्री म्हणजे लांडग्याची नवी प्रजात असल्याचा संशय व्यक्त होत आहे. चाकण ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन कांबळे यांनी सांगितले की," भटक्या कुत्र्यांनी चावा घेतलेले नागरिक दररोज उपचारासाठी येथे येतात. रुग्णालयात रेबीज प्रतिबंधक लस उपलब्ध असल्याने रुग्णांना तातडीने ही लस दिली जाते.

> "चाकण परिसरात भटक्या कुत्र्यांचे प्रमाण वाढले आहे. लहान मुले त्यामुळे भयभीत झाली असून, घराबाहेर पडणे धोक्याचे झाले आहे. मेदनकरवाडी येथेही एका बालिकेचा कुत्र्यांच्या हल्ल्यात बळी गेला होता. हिंसक कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना करणे अपेक्षित आहे."
> **- ॲड. संकेतभाऊ मेदनकर, अध्यक्ष, शरद पतसंस्था, चाकण.**

> "पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतून कुत्री चाकण परिसरात सोडली जातात. कुत्र्यांवर नियंत्रण येण्यासाठी नगरपरिषद प्रयत्न करत आहे. भटक्या कुत्र्यांना पकडणे व त्यांना एका ठिकाणी ठेवून त्यांचे निर्बीजीकरण करणे यासाठी ठेकेदाराला काम देण्यात आले आहे. यासाठी वर्षभराला सुमारे दहा लाख रुपयांचा खर्च करण्यात येत असून, आजपर्यंत चारशे कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात आलेले आहे." **- डॉ. अंकुश जाधव, मुख्याधिकारी, चाकण नगरपरिषद**

## ईपीएफओ पेन्शन योजनेसाठी अर्ज ग्राह्य धरण्याची मागणी




**पुणे (दै. संध्या)**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या १९९५उच्च पेन्शन योजनेसाठी सन २०२३ मध्ये पेन्शनधारकांनी प्रत्यक्ष ईपीएफओ कार्यालयात जाऊन सादर केलेले आफलाईन (Offline) संयुक्त दावा अर्ज ग्राह्य धरावेत,किंवा अधिकृत युएएन पोर्टल उपलब्ध करुन देण्याची मागणी समस्त खाजगी संस्थेतील निवृत्तीधारकांनी भविष्य निर्वाह निधीचे अप्पर केंद्रीय आयुक्त श्री अमितजी वशिष्ट यांच्याकडे लेखी निवेदन सादर करुन करण्यात आलेली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की अनेक पेन्शनधारकांनी सन २०२३ साली नियमानुसार भविष्य निर्वाह निधीच्या शंकरशेठ रोड (गोळीबार मैदान जवळील) येथील कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन संयुक्त दावा अर्ज जमा केलेले होते.मात्र सध्या आनलाइन (on line) प्रणालीअभावी किंवा यूएएन क्रमाक उपलब्ध नसल्याने त्यांना उच्च पेन्शनपासून वंचित ठेवले जात आहे.त्यामुळे २०२३ला सादर केलेले संबधित आनलाइन(on line) अर्ज ग्राह्य धरुन त्या पेन्शनधारकांना उच्च पेन्शन योजनेत सामावून घ्यावे. किंवा त्यांना ईपीएफओकडून अधिकृत यूएएन पोर्टल उपलब्ध करुन द्यावे,अशी विंनती करण्यात आलेली आहे.

उच्च पेन्शन योजना ही पेन्शनधारकांसाठी महत्वाची सामाजिक सुरक्षा योजना असून ती पेन्शनधारकांच्या दैनदिन जीवनाशी आणि आरोग्याशी निगडीत आहे. त्यामुळे या प्रकरणी सहानभूतीपूर्वक निर्णय लवकर घेण्यात यावा अशी मागणी निवेदनात करण्यात आलेली आहे.या मागणीबाबत केंद्रीय मंत्री. मुख्यमंत्री.खासदार यांच्याकडेही निवेदनाद्वारे मागणी करण्यात आल्याची माहीती निवृत्तीधारकांच्या वतीने देण्यात आली.

## जेजुरीत स्वच्छता दुतांचा सन्मान



**जेजुरी (दै. संध्या)**

जेजुरी नगरपरिषदेच्या घंटागाडी वर काम करणारे स्वच्छता दुत सुशीला पवार व सदानंद यादव यांचा नववर्षाचे औचित्य साधून लवथलेश्वर परिसराच्या वतीने सन्मान करण्यात आला. सदानंद यादव, व सुशीला पवार हे जेजुरी नगरपरिषदेच्या घंटा गाडीवर अनेक वर्षापासून काम करीत आहेत. लवथलेश्वर परिसरात नियमित पने नागरिकांचा कचरा गोळा करून त्याचे वर्गीकरण करत आहेत. त्यांच्या या स्वच्छतेच्या कामाबद्दल स्वच्छता दुत म्हणून येथील नागरिकांच्या वतीने पोशाख देवून त्यांचा सन्मान करण्यात आला. येथील नागरिक चारुदत्त जोशी, अनिता जोशी, चिन्मय जोशी परिवार व नागरिकांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

# 'निसर्गोपचार म्हणजे जीवनशैली' – राधाकृष्णन

**उपराष्ट्रपतींच्या उपस्थितीत उरुळी कांचन निसर्गोपचार आश्रमाचा ८१ वा स्थापना दिन उत्साहात**

**उरुळी कांचन (दै. संध्या)**



उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत उरुळी कांचन येथील महात्मा गांधी प्रेरित निसर्गोपचार आश्रमाचा ८१ वा स्थापना दिन सोहळा २२ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात निसर्गोपचाराच्या माध्यमातून आरोग्य, स्वावलंबन आणि ग्रामीण विकासाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

आपल्या भाषणात उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांनी महात्मा गांधी यांच्या विचारांचा उल्लेख करत सांगितले की, १९४६ साली मणिभाई देसाई, बाळकोबा भावे आणि गंगाबेन भाटे यांच्या सहकार्याने स्थापन झालेला हा आश्रम आज जागतिक स्तरावर ओळख निर्माण करणारे केंद्र ठरले आहे. निसर्गोपचार ही केवळ उपचारपद्धती नसून ती एक जीवनशैली असून साधेपणा, शिस्त आणि निसर्गाशी सुसंगत जीवन जगणे हेच खरे आरोग्याचे रहस्य असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

आजच्या धकाधकीच्या जीवनात मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा आणि तणावजन्य विकार झपाट्याने वाढत असल्याचे सांगत त्यांनी योग, निसर्गोपचार आणि पारंपरिक उपचारपद्धतींचे महत्त्व अधोरेखित केले. भारत 'वेलनेस टुरिझम'चे जागतिक केंद्र बनत असून उरुळी कांचनसारख्या संस्थांमुळे देशाची ओळख अधिक भक्कम होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास राज्यपाल जिष्णू देव वर्मा, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार ज्ञानेश्वर (माऊली) कटके, आश्रमाचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. नारायण हेगडे, वैद्यकीय संचालक डॉ. अभिषेक देवीकर आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्यपाल वर्मा यांनी वाढत्या लोकसंख्येसोबत अन्नाची गुणवत्ता आणि प्रदूषणामुळे आजारांचे प्रमाण वाढत असल्याचे सांगितले. अशा परिस्थितीत आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार यांसारख्या समग्र उपचारपद्धतींचा प्रसार गरजेचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह यांनी स्वदेशी उपचारपद्धती देशाला आत्मनिर्भर बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद केले. केंद्र सरकार आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून या क्षेत्राला बळ देत असल्याचेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी निसर्गोपचार आश्रमाला 'जीवनशैली घडविणारे केंद्र' असे संबोधले. महात्मा गांधींच्या 'खेड्याकडे चला' या विचाराला अनुसरून आश्रम ग्रामीण विकास, स्वावलंबन आणि साधेपणाचा संदेश देत असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. नारायण हेगडे यांनी आश्रमाच्या गेल्या आठ दशकांतील कार्याचा आढावा सादर केला. आरोग्यसेवा, ग्रामीण विकास आणि पर्यावरण संवर्धन या क्षेत्रांत आश्रम सातत्याने कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. हेगडे लिखित 'आमच्या आनंदाचे रहस्य' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त डॉ. भावार्थ ढेकणे यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला आश्रमाचे विश्वस्त, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानिमित्त परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.




## धनुष पुन्हा घाटांवर ; 'तेरे इश्क में'चा वर्ल्ड टीव्ही प्रीमियर २७ मार्चला

मुंबई (दै. संध्या)

सशक्त अभिनय, भावपूर्ण संगीत आणि प्रेमाच्या विविध छटा उलगडणारी कथा यांमुळे 'तेरे इश्क में' एक आकर्षक चित्रपट अनुभव देण्याचं वचन देतो. 'तेरे इश्क में'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर २७ मार्च रोजी रात्री ८ वाजता फक्त सोनी मॅक्सवर चुकवू नका.

सोनी मॅक्स, भारतातील अग्रगण्य हिंदी चित्रपट वाहिनी, २०२५ मधील सर्वाधिक अपेक्षित भावनिक चित्रपटांपैकी एक असलेल्या 'तेरे इश्क में'च्या जागतिक टेलिव्हिजन प्रीमियरची अभिमानाने घोषणा करत आहे. 'रांझना' या कल्ट क्लासिक चित्रपटाने भारतीय चित्रपटसृष्टीतील रोमँटिक नाटकांचे स्वरूप बदलल्यानंतर बारा वर्षांनी, राष्ट्रीय पुरस्कार विजेता अभिनेता धनुष आणि महान कथाकार आनंद एल. राय ही आयकॉनिक जोडी प्रेक्षकांना पुन्हा एकदा वाराणसीच्या रहस्यमय घाटांवर आणि अरुंद गल्ल्यांमध्ये घेऊन जाण्यासाठी एकत्र येत आहे.

केवळ एक चित्रपट न राहता, 'तेरे इश्क में'ला 'रांझना'चा आध्यात्मिक वारसदार म्हणून गौरवले जात आहे. 'रांझना'ने प्रेक्षकांना कुंदनचा निरागस चिकाटीचा स्वभाव दाखवला होता, तर 'तेरे इश्क में' शंकरची ओळख करून देतो. त्या अविस्मरणीय पात्राची एक अधिक गडद, अधिक अस्थिर सावली. लाखो चाहत्यांसाठी, धनुषला गंगेच्या काठावर धोतीमध्ये परत आलेले पाहणे हा एक नॉस्टॅल्जिक मास्टरस्ट्रोक होता, ज्याने वेड, भक्ती आणि प्रेमाची मोठी किंमत यांचे सार अचूकपणे टिपले आहे. या चित्रपटात एक अशी शक्तिशाली सर्जनशील टीम एकत्र आली आहे, जिने आधुनिक रोमँटिक कथाकथनाला एक नवीन ओळख दिली आहे.

धनुषने शंकरच्या भूमिकेत आपल्या सर्वात प्रभावी अभिनयांपैकी एक सादर केला आहे, ज्यात त्याने अस्वस्थ उत्कटता, दुखावलेला अभिमान आणि प्रेमातील हिंसाचार यांचे मूर्तिमंत रूप साकारले आहे. त्याच्या विरुद्ध, कृती सॅनॉनने आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम अभिनय सादर केला आहे, ज्यात तिने चित्रपटाच्या गोंधळलेल्या ऊर्जेला सूक्ष्मता आणि खोलीने वास्तवाचे भान दिले आहे. आनंद एल. राय यांची दूरदृष्टी भारतातील छोट्या शहरांची अस्सल स्पंदने टिपते, तर ए. आर. रहमान यांचे मनमोहक संगीत वाराणसीच्या मंदिरांतील आध्यात्मिक प्रतिध्वनींनी कथानकाला एका वेगळ्या उंचीवर नेते. 'तेरे इश्क में'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर, सशक्त कथा आणि अविस्मरणीय अभिनय सादर करण्याच्या सोनी मॅक्सच्या वचनाला अधिक दृढ करतो, ज्यामुळे जगभरातील प्रेक्षक आपल्या दिवाणखान्यातच सिनेमाच्या भव्यतेचा अनुभव घेऊ शकतील. चॅनलच्या प्रचंड देशव्यापी प्रेक्षकवर्गामुळे, हा प्रीमियर लाखो प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल आणि त्यामुळे हा टेलिव्हिजनवरील कार्यक्रम मोठ्या पडद्यावरील पदार्पणाप्रमाणेच महत्त्वपूर्ण आणि दूरगामी ठरेल.

"एक दिग्दर्शक म्हणून, चित्रपट बनवण्यापूर्वी माझ्यासाठी सर्वात महत्त्वाचा प्रश्न हा असतो की, ती कथा सांगण्यामागे माझ्याकडे खरंच काही कारण आहे का. 'तेरे इश्क में'च्या बाबतीत, याचं उत्तर तात्काळ 'हो' असं होतं. हा चित्रपट प्रेमाच्या एका गहन, तीव्र स्वरूपाचा शोध घेतो आणि अनेक अर्थांनी, प्रेमावरचा हा माझा आतापर्यंतचा सर्वात परिपक्व दृष्टिकोन आहे. ही एक बहुआयामी कथा आहे आणि जेव्हा कधी मी अशा भावनिक गुंतागुंतीवर काम करतो, तेव्हा मी सहजपणे धनुषकडे वळतो. शंकरच्या भूमिकेसाठी तो नेहमीच माझी पहिली पसंती होता, कारण मला माहित होतं की या भूमिकेसाठी अशा अभिनेत्याची गरज आहे जो या आव्हानात्मक भूमिकेत हळवेपणा आणि सामर्थ्य दोन्ही आणू शकेल."

## थोडक्यात पण महत्वाचे...




### विवो Y51 प्रो 5G लाँच; दमदार परफॉर्मन्स, 7200mAh बॅटरी आणि स्मार्ट फीचर्सची जोड

■ दीर्घ बॅटरी लाईफ आणि AI फीचर्समुळे वापरकर्त्यांसाठी नवा पर्याय

मुंबई (दैनिक संध्या) : स्मार्टफोन बाजारात आपली Y-सिरीज अधिक मजबूत करत विवोने विवो Y51 प्रो 5G हा नवा स्मार्टफोन लाँच केला आहे. स्टायलिश डिझाइनसोबत दमदार परफॉर्मन्स, दीर्घ बॅटरी लाईफ आणि स्मार्ट फीचर्स यांचा समतोल साधणारे हे डिव्हाइस विशेषतः दैनंदिन वापर आणि दीर्घकालीन पॉवरची गरज असलेल्या वापरकर्त्यांसाठी डिझाइन करण्यात आले आहे. या स्मार्टफोनमध्ये मीडियाटेक डायमेन्सिटी 7360 टर्बो चिपसेट देण्यात आला असून, तो मल्टीटास्किंग, गेमिंग आणि मनोरंजनासाठी सुरळीत आणि जलद परफॉर्मन्स प्रदान करतो. ९.२ लाखांहून अधिक AnTuTu स्कोअरसह हा फोन प्रतिसादक्षम अनुभव देतो. 8GB पर्यंत रॅम, एक्सटेंडेड रॅम सपोर्ट आणि 128GB/256GB स्टोरेजमुळे ॲप्समध्ये सहज स्विचिंग आणि स्थिर परफॉर्मन्स मिळतो. या फोनचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ७२००mAh ची मोठी बॅटरी, जी ४४W फ्लॅशचार्जसह येते. त्यामुळे एकदा चार्ज केल्यानंतर फोन आरामात पूर्ण दिवस, तसेच हलक्या वापरात दोन दिवस टिकतो. बॅटरी हेल्थ मॅनेजमेंट टेक्नॉलॉजीमुळे दीर्घकाळ चांगली कार्यक्षमता राखली जाते. तसेच रिव्हर्स चार्जिंगमुळे इतर डिव्हाइसही चार्ज करता येतात. फोटोग्राफीसाठी या फोनमध्ये ५०MP AI-आधारित मुख्य कॅमेरा देण्यात आला आहे, जो विविध प्रकाशात स्पष्ट आणि आकर्षक फोटो टिपतो. EIS सपोर्टमुळे व्हिडिओ अधिक स्थिर राहतात, तर 4K व्हिडिओ रेकॉर्डिंग, ड्युअल व्ह्यू व्हिडिओ आणि लाइव्ह फोटोसारखी फीचर्स वापरकर्त्यांचा अनुभव अधिक समृद्ध करतात. IP68 आणि IP69 रेटिंगमुळे पाण्याखालील फोटोग्राफीचाही पर्याय उपलब्ध आहे. सॉफ्टवेअरच्या बाबतीत, हा फोन OriginOS 6 सह येतो, ज्यामध्ये AI क्रिएशन, AI नोट्स, AI ट्रान्सक्रिप्ट असिस्ट, सर्कल टू सर्च यांसारखी स्मार्ट फीचर्स दिली आहेत. हेल्मेट सपोर्ट असलेले फेस अनलॉक हे रायडर्ससाठी खास वैशिष्ट्य ठरते. डिझाइनच्या बाबतीत, क्वाड-कर्व्ह्ड बॅक आणि स्लीक फ्रेममुळे फोन प्रीमियम दिसतो आणि हाताळायला आरामदायक आहे. फेस्टिव्ह रेड आणि नोबल गोल्ड या आकर्षक रंगांमध्ये तो उपलब्ध आहे.

# 'उमेद'च्या साथीने 'अन्नपूर्णा फूड अ‍ॅण्ड प्रॉडक्टस' ची लक्षवेधी घौडदौड

व्यक्तीच्या क्षमतांना योग्य मार्गदर्शन, आर्थिक पाठबळ आणि संधींची साथ मिळाली तर तो स्वतःच्या यशस्वी वाटचालीतून, इतरांना प्रेरणा देणारा दिशादर्शक ठरणारा माईलस्टोन प्रवास करतो, याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे ग्रामविकास विभागातंर्गत ग्रामीन जीवनोन्नती अभियानातून यशस्वी वाटचाल करणाऱ्या अनेक सेल्फमेड उद्योजिका, ज्यांना उद्योग क्षेत्राची, व्यवसायाची कुठलीही पार्श्वभूमी नसताना आज घडीला त्यातील किती तरी जणीचे उद्योग व्यवसाय हे लाखांच्या वर आर्थिक उलाढाल करत आहेत.



शब्दांकन – वंदना थोरात, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील रेणापूरच्या मीराबाई स्वय सहायता संघ, संविधान महिला ग्रामसमूह, सिद्धिविनायक प्रभागसंघ, पाळज येथील इयत्ता १० वी नापास असलेल्या विशेष म्हणजे उद्योगाची कुठलीही पार्श्वभूमी नसलेल्या अन्नपूर्णा फूड अँड प्रॉडक्ट्सच्या सर्वेसर्वा सुनीता अशोक कावळे यांचा उद्योजिका म्हणून सुरु असलेला यशस्वी प्रवास प्रेरणादायी आणि अभिनंदनीय आहे. सुनीता कावळे त्यांच्या अन्नपूर्णा फूड ॲण्ड प्रॉडक्स अंतर्गत ११ प्रकारची आवळ्याची उत्पादने बनवतात. त्यांनी आपल्या व्यवसायाची सुरुवात केली ती फक्त ५०० रुपयाच्या भांडवलावर आणि आजघडीला अन्नपूर्णा फूड प्रॉडक्टस ९ लाखा रुपयांपर्यंतची उलाढाल करत आहे. विशेष उल्लेखनीय म्हणजे प्रतिकूल परिस्थितीत स्वावंलबनाचा मार्ग शोधण्याच्या धडपडीत आवळ्यासारख्या आरोग्यवर्धक फळातून खाद्य पदार्थ तयार करुन त्याच्या विक्रीतून काही करता येईल या विचाराने अवघ्या पाचशे रुपयात व्यवसाय करु पाहणाऱ्या सुनीता यांचा प्रवास सोपा नव्हता, कारण आर्थिक पाठबळ तर काही नव्हतेच मात्र त्यांच्या आत्मविश्वासाला पूरक पाठिंबा देणारे वातावरण ही घरात नव्हते उलट अवतीभवतीच्या महिलांकडूनही त्यांच्या या प्रयत्नांना टिकेच्या नजरेतून बघितल्या गेले, त्यांच्या धडपडीला गांभिर्याने घेतल्या गेले नाही, तर उलट त्यांना हे जमू शकणार नाही, असे म्हटले गेले, मात्र त्यांच्या मुलींने त्यांना प्रोत्साहन देत पाठिंबा दिल्याने त्या हिमतीने आपल्या व्यवसायात जम बसवण्यासाठी प्रयत्न करत राहिल्या. आज अकरा प्रकारच्या पदार्थांची निर्मिती करणाऱ्या अन्नपूर्णा फूड प्रॉडक्टस्‌ची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या सुनीता यांनी २०१७ साली आवळ्यावर प्रक्रिया करून छोटेसे उत्पादन सुरू केले. गावात सहज मिळणाऱ्या कच्च्या मालावर आधारित आवळा कँडी, मुरंबा, चूर्ण, लोणचं इत्यादी पदार्थ बनवण्यास त्यांनी सुरवात केली. प्रत्येक गोष्ट त्यांनी स्वतःच्या हातांनी बनवली. या व्यवसायासाठी आवश्यक कच्चा माल असलेला आवळा आणण्यासाठी त्यांना बरीच मेहनत घ्यावी लागली, कधी कधी तर ५०, ६० कि.मी. लांबपर्यंत जाऊन आवळा आणण्यापासून ते तो वाळवणे, त्याच्यापासून उत्पादन तयार करण्यासाठीची सर्व मेहनत घेऊन तो तयार माल बाजारपेठेत विक्री करण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया पार पाडत पुढे जात असताना सुनीता यांना अनेक अडथळे, अडचणींचा सामना करावा लागत होता.

मात्र तरी त्या जिद्दीने पुढे जात राहिल्या, त्यांच्या या संघर्षात त्या २०१९ मध्ये उमेद (एमएसआरएलएम) अभियानाच्या माध्यमातून जोडल्या गेल्या. याठिकाणी त्यांच्या उद्योग उभारणीच्या प्रयत्नांना व्यावसायिक कौशल्य देणारे ब्रँडिंग, पॅकेजिंग, मार्केटिंग याची उपयुक्त माहिती देणारे प्रशिक्षण मिळाले. ग्रामविकास विभागाच्या मार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सुनीता यांना विक्रमी विक्रीचा अविस्मरणीय अनुभव प्रत्यक्ष घेता आला, या प्रदर्शनात अन्नपूर्णा फूड प्रॉडक्टसच्या उत्पादनांना ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला त्यातून सुनीता यांनी आपल्या उत्पादनांची थोडी थोडकी नव्हे तर थेट १२ लाख रुपयांची विक्री केली, रेणापूर तालुक्यातील छोट्याशा गावातून सुरु केलेल्या व्यवसायाच्या उत्पादनांची इतकी मोठी विक्री होणे हे त्यांचे मोठे यश होते, कारण या विक्रीतून त्यांचा आत्मविश्वास वृद्धीगंत होऊन उद्योगाचे नवीन दालन त्यांच्यासमोर खुले झाले. व्यापक स्वरुपातील बाजारपेठेची ओळख आणि प्रत्यक्ष सहभागी होण्याचा अनुभव त्यांना पुढील वाटचालीसाठी निश्चितच प्रेरणा देणारा आहे.

आपल्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या सुनीता यांना व्यवसाय वाढवण्यासाठी शासन योजनांच्या माध्यमातून उत्तम सहकार्य मिळत असून (पीएमएफएमई) योजना, शासकीय अनुदान, मशिनरी, पॅकेजिंग यूनिट यासाठी अर्थसहाय्य मिळण्यासाठीची प्रक्रिया त्यांनी सुरु केली आहे. आवळ्याचे उत्पादन आरोग्यदायी आहे, त्याला मोठी मागणी आहे, आणि भविष्यात 'अन्नपूर्णा' हा ब्रँड संपूर्ण भारतात पोहोचेल या विश्वासातून कार्यरत सुनीता यांचा हा प्रेरणादायी प्रवास इतरांच्या उमेदीला निश्चितच बळ देणारा आहे.

आपल्याला स्वावलंबनाची मिळालेली संधी अन्य महिलांच्या ही वाट्याला यावी, ही प्रामाणिक इच्छा असेलल्या सुनीता यांना स्वतःच्या यशाप्रमाणे इतर महिलांनीही यशाची चव चाखावी, असे प्रकर्षाने वाटत. म्हणूनच त्यांनी महिलांना विशेषतः विधवा, परित्यक्ता, गरजू महिलांना स्वअनुभवातून व्यवसायाचे मार्गदर्शन केले, त्यांच्या हाताला काम दिले.

"एक बाई सक्षम झाली, की ती इतरांना मदतीचा हात देऊ शकते." या व्यापक जाणीवेतून सुनीता यांच 'अन्नपूर्णा' हे केवळ फूड ब्रँड नाही, तर महिलांना स्वाभिमानाने उभे करणारे एक व्यासपीठ आहे. आर्थिक, शैक्षणिक भांडवलाचा अभाव असताना अडचणींतून मार्ग काढत स्वकष्टाने आणि जिद्दीने सुनीता यांनी इथपर्यंतचा गाठलेला टप्पा हा निश्चितच यशाच्या प्रवासातील मैलाचा दगड आहे.



# निसर्ग संवर्धनाचा 'सागरेश्वर पॅटर्न'

*ओसाड माळरानावर फुललेलं भारताचं पहिलं मानवनिर्मित नंदनवन*

संकलन – संप्रदा बीडकर, जिल्हा माहिती अधिकारी, सांगली

२१ मार्च हा दिवस संपूर्ण जगभरात 'जागतिक वनीकरण दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकारातून साजरा होणाऱ्या या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे वनांचे महत्त्व समजावून सांगणे, जैवविविधतेचे संरक्षण करणे आणि ढासळणारा पर्यावरणीय समतोल टिकवण्यासाठी मानवाला प्रेरित करणे हा आहे. आजच्या काळात जेव्हा सिमेंटची जंगले वाढत आहेत, तेव्हा सांगली जिल्ह्यात वसलेले यशवंतराव चव्हाण वन्यजीव सागरेश्वर अभयारण्य हे निसर्ग संवर्धनाचे जणू प्रत्यक्ष आणि आदर्श उदाहरण म्हणून जगासमोर उभे आहे.

सागरेश्वर वन्यजीव अभयारण्य हे निसर्गसौंदर्य, सांस्कृतिक वारसा आणि मानवी परिश्रमांचा एक अद्भुत संगम आहे. या अभयारण्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, इतर अभयारण्यांप्रमाणे हे नैसर्गिकरीत्या विकसित झालेले नाही. तर ते परिसरातील लोकांनी एकत्र येत निर्माण केलेले भारतातील पहिले मानवनिर्मित अभयारण्य आहे. एकेकाळी या परिसरात केवळ उघड्या-बोडक्या टेकड्या आणि ओसाड माळरान होते. मात्र, वृक्षमित्र धों. म. मोहिते यांनी आपल्या अथक प्रयत्नातून या ओसाड माळरानाचं नंदनवनात रूपांतर करण्याची किमया केली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्थानिक नागरिकांना सोबत घेऊन त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण वृक्षलागवडीमुळे आज येथे १०.८७ चौरस किलोमीटरवर पसरलेली समृद्ध वनसंपदा निर्माण झाली आहे.

कडेगाव, वाळवा आणि पलूस या तीन तालुक्यांच्या संगमावर वसलेले हे अभयारण्य आज निसर्गप्रेमी आणि वन्यजीव निरीक्षकांसाठी एक नंदनवन ठरत आहे. येथे गवताळ टेकड्या, कोरड्या पानगळीचे जंगल आणि मोकळी कुरणे पाहायला मिळतात. विशेष म्हणजे, इतर अभयारण्यांप्रमाणे येथे कोणतेही बारमाही नैसर्गिक जलस्रोत नाहीत. असे असूनही, मानवी नियोजनाच्या जोरावर येथे चिंच, कडुलिंब, निलगिरी, बाभूळ, साग, खैर, पळस आणि बहावा अशा अनेक वृक्षप्रजातींची यशस्वी जोपासना करण्यात आली आहे.

या हिरव्यागार आच्छादनामुळेच आज येथे वन्यजीवांचा मोठा राबता आहे. सांबर, काळवीट, चितळ आणि मंटजॅक (रानमांजर) यांसारख्या हरणांच्या विविध प्रजाती येथे मुक्तपणे वावरताना दिसतात. त्यांच्यासोबतच रानडुक्कर, कोल्हा, तरस आणि साळींदर यांसारख्या प्राण्यांचे दर्शन वन्यजीव निरीक्षणाचा अनुभव अधिक रोमांचक बनवते. केवळ प्राणीच नव्हे, तर रंगीबेरंगी मोर आणि विविध प्रकारचे पक्षी पक्षीनिरीक्षकांना भुरळ घालतात. या परिसरात विविध प्रकारचे सर्प आणि फुलपाखरांचीही मोठी संख्या असून, ते या नाजूक पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत करतात. पावसाळ्यात जून ते सप्टेंबर – ऑक्टोबर पर्यंत निसर्गाचे सौंदर्य पहाण्यासाठी भेट देण्यासाठी सोयीस्कर काळ आहे.

आज वाढती लोकसंख्या, शहरीकरण आणि जंगलतोड यामुळे हवामान बदल आणि तापमान वाढ यांसारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत.

अशा परिस्थितीत सागरेश्वर अभयारण्याचे उदाहरण अत्यंत अनुकरणीय आहे. निसर्गाशी असलेले आपले नाते जपण्याची आणि भावी पिढ्यांसाठी हिरवेगार भविष्य निर्माण करण्याची हीच खरी वेळ आहे. केवळ शासनावर अवलंबून न राहता, सामान्य नागरिकांनीही वृक्षारोपण करणे, झाडांचे संरक्षण करणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे आवश्यक आहे. तरच आपले जीवन अधिक समृद्ध आणि सुरक्षित राहू शकते.



# माणगाव परिषद : सामाजिक क्रांतीचा एल्गार




भारतीय समाजव्यवस्थेतील जातीभेदाच्या भिंती पाडण्यासाठी आणि शोषित-वंचितांना आत्मभान मिळवून देण्यासाठी ज्या काही मोजक्या ऐतिहासिक घटना घडल्या, त्यात 'माणगाव परिषद' हे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. 21 आणि 22 मार्च 1920 रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील तत्कालीन कागल संस्थानातील माणगाव या छोट्याशा गावात ही परिषद संपन्न झाली. या परिषदेला आता 106 वर्षे पूर्ण होत आहेत. ही परिषद केवळ एक राजकीय सभा नव्हती, तर ती भारतीय लोकशाहीच्या आणि सामाजिक समतेच्या प्रवासातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा होता आणि तो पुढे एक सामाजिक क्रांतीचा एल्गार ठरला.

**दोन युगपुरुष एकाच मंचावर : शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर**

माणगाव परिषदेचे सर्वात ऐतिहासिक आणि रोमांचक वैशिष्ट्य म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन युगपुरुषांचे एकाच मंचावर येणे. त्यावेळी डॉ. आंबेडकर हे अवघ्या 29 वर्षांचे तरुण होते आणि नुकतेच विदेशातून उच्च शिक्षण घेऊन परतले होते. राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्यातील अफाट बुद्धिमत्ता, तळमळ आणि नेतृत्वगुण ओळखले होते. महाराजांनी स्वतः पुढाकार घेऊन डॉ. आंबेडकरांना या परिषदेचे अध्यक्षस्थान भूषवण्याची विनंती केली. एका बाजूला सत्तेचा आणि अधिकाराचा वापर लोककल्याणासाठी करणारे 'लोकराजा' आणि दुसऱ्या बाजूला पददलितांचे कैवारी बनलेले 'विद्वान' बाबासाहेब, असा हा अभूतपूर्व संगम होता.

**ऐतिहासिक भविष्यवाणी आणि नेतृत्वाचा उदय :** या परिषदेत राजर्षी शाहू महाराजांनी केलेले भाषण भारतीय इतिहासात अजरामर झाले आहे. महाराजांनी उपस्थितांना संबोधित करताना म्हटले होते, तुम्हाला तुमचा नेता (डॉ. आंबेडकर) मिळाला आहे. माझी खात्री आहे की, ते केवळ तुमचेच नव्हे तर संपूर्ण भारताचे नेते होतील. ही केवळ स्तुती नव्हती, तर एका द्रष्ट्या राजाने भविष्यातील महामानवावर ठेवलेला विश्वास होता. शाहू महाराजांनी जाहीरपणे डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व मान्य केले आणि समाजाला त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले. या एका वाक्याने डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वावर अधिकृत शिक्कामोर्तब झाले आणि इथूनच एका नव्या पर्वाची सुरुवात झाली.

**परिषदेचे ठराव आणि सामाजिक परिणाम :** माणगाव परिषदेत केवळ भाषणे झाली नाहीत, तर सामाजिक परिवर्तनासाठी ठोस ठराव मंजूर करण्यात आले. त्यात प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होता:

- अस्पृश्यता निवारण: समाजात रुजलेली अस्पृश्यतेची अनिष्ट प्रथा मुळापासून उपटून टाकणे.
- शिक्षण प्रसार: शोषित वर्गातील मुला-मुलींना दर्जेदार शिक्षण मिळवून देणे, कारण शिक्षण हेच प्रगतीचे साधन आहे.
- राजकीय अधिकार: दलितांना विधिमंडळात आणि प्रशासनात योग्य प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी मागणी करणे.
- स्वाभिमानाची जागृती: 'बहिष्कृत' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजाने स्वतःचा न्यूनगंड सोडून देऊन आत्मसन्मानाने जगण्यास शिकणे.

या परिषदेने डॉ. आंबेडकरांच्या 'मूकनायक' या वृत्तपत्रासाठी देखील मोठे बळ दिले. शाहू महाराजांनी या वृत्तपत्राला आर्थिक मदत केली होती, जेणेकरून वंचितांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचू शकेल.

**माणगाव : एक सन्मानभूमी :** आज माणगाव (ता. हातकणंगले) ही भूमी 'सन्मानभूमी' म्हणून ओळखली जाते. दरवर्षी वर्धापन दिनाचे औचित्य साधून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि 'बार्टी' (BARTI) पुणे यांच्या वतीने भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यावर्षी 21 मार्च रोजी 'क्रांतीचा साक्षीदार' हे एकपात्री नाटक, विविध मान्यवरांची व्याख्याने आणि 22 मार्च रोजी प्रसिद्ध गायक उत्कर्ष शिंदे व कबीर नाईकनवरे यांचा प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. ही आयोजने केवळ उत्सवी नसून, नव्या पिढीला महापुरुषांच्या विचारांची ओळख करून देण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. माणगाव परिषद ही समतेची, बंधुत्वाची आणि न्यायाची सुरुवात होती. या परिषदेने शिकवले की, जेव्हा सत्ता (शाहू महाराज) आणि ज्ञान (डॉ. आंबेडकर) एकत्र येतात, तेव्हा मोठी क्रांती घडते. आज 106 वर्षांनंतरही जातीभेदाची आव्हाने आपल्यासमोर आहेत. अशा वेळी माणगाव परिषदेचा हा वारसा आपल्याला प्रेरणा देतो. महापुरुषांच्या विचारांना केवळ अभिवादन न करता, ते आचरणात आणणे हीच या ऐतिहासिक दिनाची खरी फलश्रुती ठरेल.

**सचिन अडसूळ, जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आमदार शेखर निकम यांची मुख्यमंत्र्यांशी भेट; विकासकामांवर चर्चा

चिपळूण (दैनिक संध्या) : चिपळूण-संगमेश्वर मतदारसंघाचे आमदार शेखर निकम यांनी सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन मतदारसंघातील विविध विकासकामांबाबत चर्चा केली. राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना झालेल्या या भेटीत पायाभूत सुविधा, प्रलंबित प्रकल्प तसेच स्थानिक प्रश्नांवर सविस्तर संवाद साधण्यात आला. यावेळी निकम यांनी काही महत्त्वाची निवेदनेही मुख्यमंत्र्यांकडे सादर केली. मुख्यमंत्र्यांनी संबंधित मागण्यांवर सकारात्मक भूमिका दर्शवित आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.




### आळंदीत शहीद दिना निमित्त विनम्र अभिवादन

आळंदी (दैनिक संध्या) : संत ज्ञानेश्वर प्रवासी वाहतूक रिक्षा संघटना व जाणीव संघटना, कष्टकरी कामगार पंचायत, अलंकापुरी शहर पत्रकार यांच्यसंयुक्त विद्यमाने आज रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर, खंडोबा मंदिर रोड परिसर येथे क्रांती पार्क या ठिकाणी शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना 95 व्या बलिदान दिना निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी पत्रकार महादेव पाखरे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लाभले. या प्रसंगी नर्शिग गायकवाड, सतिश ठाकूर, रामदास सुर्यवंशी, प्रमोद बुकने, सतिश थोरवे, गणेश गावडे, नंदू कुटे, पंकज शिंदे, संजय वाबळे, संदीप रंधवे, धीरज कांबळे, दत्ता चौधरी,नमदेवचौढरी, राहुल पाटोळे, गणपत घुंड्रे, चंदू कबके,नितीन शेठ अरगडे , नितीन नाहाते, रुक्साना सुलतान भाई शेख, विशुद मेटे , संगीता मेटे, अफसाना भाभी , सुयोग कांबळे, श्रीरंग पोटे, चंदू सवंडकर, अण्णा वागमारे, वंचित बहुजन आघाडी चे कार्य कर्ते तसेच आळंदी कर ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक व आभार सुलतान भाई शेख यांनी केले.

### अपघातातील चार चाकी मोटार बुडाली कालव्यात

नारायणगाव (दैनिक संध्या) : निमगाव सावा (ता. जुन्नर) येथील रहिवासी रवींद्र पांडुरंग शेगर हे आपल्या डस्टर मोटारीतून (क्र. एम.एच.४६ ए.यू.६१७०) गडाचीवाडी येथून निमगाव सावाकडे जात होते. गडाचीवाडी येथील मीना शाखा डावा कालव्याच्या रस्त्याने निमगाव सावाकडे जात असताना एक दुचाकीस्वार अचानक समोरून आल्याने त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात शेगर यांची मोटार कालव्यात कोसळली. ज्या ठिकाणी मोटार कालव्यात गेली, त्या ठिकाणापासून पुढे पाचशे मीटर अंतरावर मोटार पाण्याच्या प्रवाहात वाहत जाऊन ती गाडी पूर्णपणे बुडाली होती. यावेळी शेगर हे परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रसंगावधान राखत मोटारीच्या दरवाजाच्या काचेतून बाहेर आले. त्यानंतर त्यांचे मित्र रवींद्र वामन यांना मोबाईलवर संपर्क साधून घटनेची माहिती दिली. या घटनेची माहिती मिळताच रवींद्र वामन, संतोष काळे, कैलास काळे, सचिन काळे, सुहास काळे,साहिल खंडागळे, राहुल वामन , दत्ता वामन यांनी क्षणाचाही विलंब न लावता घटनास्थळी धाव घेतली. शेगर यांना श्वास घेण्यासाठी त्रास होऊ लागल्याने त्यांना रवींद्र वामन यांनी तत्काळ नारायणगाव येथील एका खासगी रुग्णालयात उपचारांसाठी दाखल केले.दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थांनी व तरुणांनी घटनास्थळी धाव घेतली. नारायणगाव पोलिस ठाण्याचे पोलिस कर्मचारीही घटनास्थळी दाखल झाले होते. रात्री उशिरा तरुणांनी क्रेनच्या साहाय्याने गाडी बाहेर काढली. या अपघातात गाडीचे मोठे नुकसान झाले आहे.



# चेतन महाजन यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश

सासवड (दै. संध्या)

पुरंदर तालुका युवक काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष चेतन महाजन यांनी आपल्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. पुरंदर-हवेलीचे माजी आमदार आणि पश्चिम महाराष्ट्र भाजपचे सरचिटणीस संजय जगताप तसेच भाजपचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर वढणे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा सासवड येथे संपन्न झाला.

याप्रसंगी बोलताना जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर वढणे यांनी चेतन महाजन यांचे स्वागत केले. महाजन यांचा तळागाळातील दांडगा जनसंपर्क आणि युवकांमधील त्यांची पकड पाहता, आगामी काळात तालुक्यातील भाजपची पक्षसंघटना तसेच युवकांची फळी अधिक मजबूत होण्यासाठी मोठी मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी चेतन महाजन यांनीही आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, विकासाच्या राजकारणाला साथ देत आपण आता पूर्ण ताकदीने पक्षसंघटना वाढविण्यासाठी कार्य करणार आहोत.

याप्रसंगी यामध्ये निरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संदीप फडतरे, माजी पंचायत समिती सदस्या सुनिता कोलते, नगरसेवक प्रदीप राऊत, मयूर चौखंडे, माजी उपनगराध्यक्ष विजय वढणे, प्रवीण पवार, संदीप राऊत, मनोज म्हेत्रे, तुषार जगताप, तुषार ढुमे, ॲड. आशपाक बागवान, ॲड. अनुराग टिळेकर, धर्माजी गायकवाड, संपत जाधव, आबा महाजन, गणेश महाजन, मोबीन बागवान, सागर घाटगे, सौरभ जाळिंद्रे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष संभाजी काळाणे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार जयेंद्र निकम यांनी मानले.

## ९५ व्या शहीद दिनानिमित्त राजगुरुनगरात विविध कार्यक्रम

राजगुरुनगर (दै. संध्या)

■ स्मारक विकासाचा मुद्दा अधिवेशनात मांडणार – आमदार बाबाजी काळे



हुतात्मा राजगुरू यांच्या ९५ व्या शहीद दिनानिमित्त त्यांच्या जन्मगावी राजगुरुनगर येथे विविध देशभक्तिपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार बाबाजी काळे यांनी हुतात्मा राजगुरू स्मारक व परिसर विकासाचा मुद्दा येत्या अधिवेशनात मांडणार असल्याचे स्पष्ट केले. राजगुरुनगर एस.टी. स्थानक परिसरातील हुतात्मा राजगुरू, भगतसिंग आणि सुखदेव यांच्या स्मृती शिल्पास मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. हुतात्मा राजगुरू प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात मोठ्या संख्येने नागरिक, विद्यार्थी आणि मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार बाबाजी काळे म्हणाले, "हुतात्मा राजगुरू यांच्यामुळे खेड तालुक्याचे नाव संपूर्ण देशभरात उज्ज्वल झाले आहे. त्यांच्या कार्याचा आपल्याला अभिमान आहे. स्मारक आणि परिसर विकासासाठी अधिवेशनात ठोस चर्चा करून तालुक्याच्या वतीने भूमिका मांडणार आहे."

या कार्यक्रमास प्रांताधिकारी अनिल दौंडे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, माजी आमदार दिलीप मोहिते, गटविकास अधिकारी विशाल शिंदे, पंचायत समिती सभापती विद्याताई मोहिते, उपसभापती मंगेश सावंत, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती विजयसिंग शिंदे, पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण, तसेच विविध राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

सकाळी हुतात्मा राजगुरू यांच्या जन्मस्थळी पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी प्रांताधिकारी अनिल दौंडे, नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ, उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर, तसेच विविध पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहीद दिनानिमित्त तीन दिवस विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मॅरेथॉन, सायकल स्पर्धा, आरोग्य शिबिर आणि स्वातंत्र्य संग्रामावर आधारित भव्य प्रदर्शन यांचा समावेश होता.

## बिबट्याचा धुमाकूळ; गोठ्यात घुसून २१ कोंबड्या व बदकाचा फडशा

कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर तालुक्यातील कवठे येमाई परिसरात बिबट्याच्या हालचालींनी पुन्हा एकदा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. फाकटे रोडनजीक टावरे वस्ती येथील गट नंबर 44/1अ येथे शेतकरी अफजल इनामदार यांच्या शेतातील गोठ्यावर बिबट्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अफजल इनामदार यांच्या गोठ्याभोवती सुमारे ७ फूट उंचीची जाळी बसविण्यात आली होती. मात्र, रात्रीच्या सुमारास बिबट्याने ही जाळी ओलांडून गोठ्यात प्रवेश केला. यावेळी गोठ्यात पाळलेल्या बदकासह २० ते २५ गावरान कोंबड्यांवर हल्ला करून त्यांचा फडशा पाडला. या घटनेत इनामदार यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.सकाळी अफजल इनामदार यांच्या पत्नी आशाबी इनामदार व मुले गोठ्यावर गेल्यानंतर हा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. गोठ्यातील मृत कोंबड्या व बदकांचे अवशेष पाहून त्यांनी तात्काळ ग्रामस्थांना माहिती दिली. या घटनेनंतर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## वारूळवाडी येथे गणपीर बाबांच्या संदलाचे आयोजन

नारायणगाव (दै. संध्या)

वारूळवाडी (ता. जुन्नर) येथे हिंदू मुस्लिम धर्मीयांचे श्रद्धास्थान असणारे जागृत देवस्थान हजरत गणपीर बाबा यांचा संदल सालाबादप्रमाणे चैत्र.शु.8 शके 1948 गुरुवार दि. 26/3/ 2026 रोजी आयोजित केला आहे. तरी संदल मिरवणूक मावळेआळी (नारायणगाव) पासून सायंकाळी ठीक 8 वाजता श्री काशिनाथ रखमाजी लोखंडे (पुजारी )यांच्या घरातून निघेल व गणपीर बाबा मंदिर येथे जाईल. तसेच बाबांना रात्री 10 वाजता संदल चढविला जाईल. तरी सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाची शोभा वाढवावी.ही विनंती गणपीर बाबा सेवा मंडळाने केली आहे.



## सीएनजीच्या कामांना प्राधान्य; एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या सूचना

**आपत्कालीन सेवा असतानाही ९ लाख नागरिकांपर्यंत जाणारी गॅस पाईप लाइन रखडलेली**

पुणे (दै. संध्या)

देशभरातील सीएनजी प्रकल्पांशी संबंधित कामांना प्राधान्याने गती देण्याच्या सूचना केंद्र सरकारकडून देण्यात आल्या आहेत. यासोबतच एलपीजी (LPG) पुरवठ्यात उद्भवणाऱ्या अडचणी दूर करून नागरिकांना अखंडित सेवा देण्यावरही भर देण्यात आला आहे. अशी माहिती भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि पेट्रोल डीलर असोशीएशनचे राष्ट्रीय सदस्य अली दारूवाला यांनी दिली.

केंद्र सरकारच्या संबंधित विभागाकडून राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना पाठवलेल्या पत्रामध्ये सी एन जी पायाभूत सुविधा उभारणीतील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामध्ये पाइपलाइन टाकणे, परवानग्या, रस्ते खोदकाम मंजुरी आणि विविध विभागांमधील समन्वय यावर विशेष लक्ष देण्यास सांगितले आहे.

तसेच, एलपीजी पुरवठ्याबाबत काही भागांत निर्माण होणाऱ्या अडचणींचा आढावा घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वितरण व्यवस्थेत सुधारणा करून ग्रामीण व शहरी भागांमध्ये गॅस उपलब्धता सुरळीत ठेवण्याचे उद्दिष्ट आहे.

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून नागरिकांना सुरक्षित, परवडणारी आणि अखंडित ऊर्जा सेवा उपलब्ध करून द्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

पुणे, पिंपरी - चिंचवड शहरात काही सोसायटयांना थेट पाईप लाईनद्वारे गॅस पुरवठा केला जातो. शहरात महानगर गॅस लिमिटेडने यासाठी पुढाकार घेतला आहे. हडपसर भागात पाईप लाइन द्वारे गॅस पुरवठा करण्यात येणार आहे, मात्र पुलगेट येथे सायकल ट्रॅक खोदायचा की नाही या वादात सदरील काम रखडले आहे. हा प्रश्न सुटला तर ९ लाख नागरिकांना आणि २५ हजार रिक्षा चालकांना गॅस मिळणार आहे. महानगर गॅस लि. कंपनी महापालिकेकडे पैसे भरायला तयार आहे, मात्र पालिका प्रशासन दाद देत नाही, तसेच महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे पाठपुरावा करूनही प्रश्न सुटला नाही. आज गॅस पुरवठा करण्यास अडथळे आले तर एस्मा कायदा लागू करण्यात आला आहे. यामुळे महापालिकेने तत्काल मार्ग काढावा अशी मागणी अली दारूवाला यांनी केली आहे.

## आयडी फ्रेश फूडची ऑर्गेनिक सेगमेंटमध्ये प्रवेश करण्याची घोषणा

पुणे (दै. संध्या)

भारतातील सर्वाधिक पसंतीचा फ्रेश फूड ब्रँड आयडी फ्रेश फूड (iD Fresh Food) ने ऑर्गेनिक सेगमेंटमध्ये प्रवेश करण्याची घोषणा करत आयडी ऑर्गेनिक बॅटर लॉन्च केले आहे. हे लॉन्च आयडी च्या त्या प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे, ज्यामध्ये चव, प्रामाणिकता आणि पारदर्शकतेशी कोणतीही तडजोड न करता क्लीन-लेबल, ताजे आणि विश्वासार्ह दैनंदिन अन्नपदार्थ तयार केले जातात.

आपल्या ऑर्गेनिक बॅटर रेंजसाठी कंपनी एक स्थापित ऑर्गेनिक सोर्सिंग मॉडेलद्वारे कर्नाटक आणि आंध्र प्रदेशमधील २,५०० हून अधिक शेतकऱ्यांकडून धान्य खरेदी करत आहे. या प्रक्रियेत एनजीओ सक्रियपणे शेतकरी सहभाग आणि स्थानिक पातळीवरील सहाय्य प्रदान करत आहेत. ही सोर्सिंग पद्धत जबाबदार शेतकरी भागीदारी आणि शाश्वत शेती पद्धतींप्रती iD ची दीर्घकालीन बांधिलकी दर्शवते.

लॉन्चबाबत प्रतिक्रिया देताना, आयडी फ्रेश फूड इंडियाचे सीईओ, रजत दिवाकर म्हणाले,




"आयडी ऑर्गेनिक च्या पुढील टप्प्याची सुरुवात करताना आम्ही बाजारातील अंतर्दृष्टी लक्षात घेऊन या उत्पादनाची नव्याने मांडणी केली आहे आणि उत्पादनावर अधिक लक्ष केंद्रित केले आहे. आयडी मध्ये दैनंदिन अन्न नेहमीच विश्वास आणि पारदर्शकतेवर आधारित राहिले आहे, आणि ऑर्गेनिक क्षेत्रात प्रवेश करणे ही त्या विश्वासाची नैसर्गिक पुढची पायरी आहे. आयडी ऑर्गेनिक बॅटर द्वारे आम्ही ग्राहकांना प्रमाणित ऑर्गेनिक सोर्सिंगची हमी देत आहोत, तसेच त्यांनी आमच्याकडून अपेक्षित असलेली चव, ताजेपणा आणि सातत्य कायम ठेवत आहोत."

हे उत्पादन पहिल्या टप्प्यात मुंबई, पुणे, बेंगळुरू आणि चेन्नई येथे लॉन्च केले जाईल आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म तसेच निवडक मॉडर्न ट्रेड आउटलेट्समध्ये उपलब्ध असेल. दुसऱ्या टप्प्यात ही रेंज हळूहळू इतर शहरांमध्ये आणि वितरण माध्यमांमध्ये विस्तारला जाईल.

## खरात प्रकरणावर युवासेनेचा निषेध; "एकट्या चाकणकरांवर कारवाई का ?" – रेवणनाथ गायकवाड यांचा सवाल

कवठे येमाई (दै. संध्या)

कथित भोंदू बाबा कॅप्टन अशोक खरात प्रकरणावर युवासेना (उ.बा.ठा) पुणे उपजिल्हाप्रमुख रेवणनाथ शांताराम गायकवाड यांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे. संबंधित आरोपीने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप गंभीर व निंदनीय असल्याचे सांगत त्याला कठोरात कठोर शिक्षा,अगदी फाशीची शिक्षा व्हावी,अशी मागणी त्यांनी केली.

याचवेळी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावर एकट्यांवरच कारवाई होत असल्याबद्दल गायकवाड यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "या प्रकरणात अनेक मंत्री, खासदार, आमदार आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचे फोटो समोर आले आहेत. मग



फक्त चाकणकरांनाच लक्ष्य का केले जात आहे ?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

गायकवाड यांनी पुढे म्हटले की, देशाचे गृहमंत्री अमित शाह, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच सुनील तटकरे,दिपक केसरकर, राधाकृष्ण विखे पाटील, चंद्रकांत पाटील, जयंत पाटील, निलेश लंके, श्रीकांत शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांचे फोटो या प्रकरणाशी संबंधित म्हणून समोर आले असतील, तर नैतिकतेच्या आधारावर सर्वांवर समान निकष लावले जावेत."जर चाकणकरांचा राजीनामा घेतला गेला असेल, तर ज्या-ज्या लोकांचे आरोपीसोबत फोटो आहेत, त्या सर्वांनीही नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामे द्यावेत व त्यांच्यावरही चौकशी व्हावी," अशी मागणी गायकवाड यांनी केली. तसेच काही महिला पदाधिकारी वैयक्तिक स्वार्थातून पातळी सोडून टीका करत असल्याचा आरोप करत त्यांनी अशा प्रवृत्तींचा ही निषेध केला.दरम्यान, या प्रकरणामुळे राज्यभरात संतापाची लाट उसळली असून संबंधित आरोपीवर कडक कारवाई करण्याबरोबरच सर्व संबंधितांची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# नवी दिल्लीत महापारेषणच्या डिजिटल स्टॉलला उत्स्फूर्त प्रतिसाद

**केंद्रीय ऊर्जामंत्री श्री. खट्टर, श्री. नाईक, राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना बोर्डीकर यांनी भेट देऊन केले कौतुक**

पुणे (दै. संध्या)

येथे आयोजित भारत इलेक्ट्रिसिटी परिषदेमध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) आकर्षक व पर्यावरणपूरक आधुनिक तंत्रज्ञान केंद्रित स्टॉलला अभ्यागतांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. केंद्रीय ऊर्जामंत्री श्री. मनोहरलाल खट्टर, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक तसेच महाराष्ट्राच्या ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी स्टॉलला



भेट देत महापारेषणच्या कार्याचे कौतुक केले. नवी दिल्लीतील यशोभूमी, व्दारका येथे भरविण्यात आलेल्या या चार दिवसीय परिषदेत महापारेषणने आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित स्टॉल उभारला होता. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली, संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण आणि अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्टॉल साकारण्यात आला.

या स्टॉलमध्ये महापारेषणची प्रगती, ध्येय-उद्दिष्टे, तसेच भविष्यातील २०३० पर्यंतचे नियोजन याबाबत डिजिटल माध्यमातून माहिती सादर करण्यात आली. ड्रोन आणि मोबाईल ॲप तंत्रज्ञानाव्दारे पारेषण वाहिनी पेट्रोलिंग, एमटीएएमसी सबस्टेशन ऑटोमेशन प्रणाली यांसारख्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती अभ्यागतांना देण्यात आली. या स्टॉलला परिषदेत उल्लेखनीय भेटी मिळाल्या असून देश-विदेशातील प्रतिनिधींनी महापारेषणच्या तांत्रिक प्रगतीचे विशेष कौतुक केले.

महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. राधाकृष्णन बी., तेलंगणा साऊथ वीज वितरण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. जितेश पाटील, महापारेषणचे संचालक (संचलन) श्री सतीश चव्हाण तसेच महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे कार्यकारी संचालक श्री. शशांक जेवळीकर यांनी स्टॉलला भेट देऊन समाधान व्यक्त केले. तसेच आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रतिनिधींनीही स्टॉलला भेट देत महापारेषणच्या नवतंत्रज्ञानाची प्रशंसा केली.